सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात साध्वी प्रज्ञासह सर्व आरोपी निर्दोष

## कोर्ट म्हणाले- स्फोट झाला, पण बॉम्ब मोटरसायकलमध्ये ठेवला होता हे सिद्ध झाले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मालेगाव**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात एनआयएच्या विशेष न्यायालयाने साध्वी प्रज्ञासह सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात ७ मुख्य आरोपींमध्ये भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर धर द्विवेदी यांचा समावेश होता.

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमध्ये स्फोट झाला होता. यामध्ये ६ जणांचा मृत्यू



झाला होता आणि सुमारे १०० जण जखमी झाले होते. सुमारे १७ वर्षांनंतर दिलेल्या निकालात न्यायाधीश ए.के. लाहोटी म्हणाले की, तपास यंत्रणा आरोप सिद्ध करू शकलेली नाही, त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा मिळावा.

न्यायाधीश लाहोटी म्हणाले की, स्फोट झाला होता, परंतु मोटारसायकलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता हे सिद्ध झाले नाही. मोटारसायकल साध्वी प्रज्ञा यांच्या नावावर होती हे देखील सिद्ध झाले नाही. कर्नल प्रसाद पुरोहित यांनी बॉम्ब बनवला होता हे देखील सिद्ध झाले नाही.या प्रकरणाचा निर्णय ८ मे २०२५ रोजी देण्यात येणार होता, परंतु त्यानंतर न्यायालयाने तो ३१ जुलैपर्यंत राखीव ठेवला. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा प्रारंभिक तपास महाराष्ट्र एटीएसने केला होता. २०११ मध्ये हा खटला एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने २०१६ मध्ये आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ३ तपास संस्था आणि ४ न्यायाधीश बदलले आहेत.२९ सप्टेंबर २००८ रोजी लोक रमजान महिना आणि नवरात्रोत्सव साजरा करण्यात व्यस्त होते. रात्री ९.३५ वाजता मालेगावमधील भिखू चौकात बॉम्बस्फोट झाला. सर्वत्र धूर आणि लोकांचे किंकाळ्या ऐकू येत होत्या. ६ जणांचा जागीच मृत्यू झाला. १०० हून अधिक लोक जखमी झाले.

### न्यायालयाने निकालामध्ये काय म्हटले?

श्रीकांत प्रसाद पुरोहित यांच्या निवासस्थानी स्फोटके साठवल्याचा किंवा जमा केल्याचा कोणताही पुरावा सापडला नाही. पंचनामा तयार करताना, तपास अधिकाऱ्यांनी गुन्ह्याच्या ठिकाणाचे कोणतेही रेखाचित्र तयार केले नाही. गुन्ह्याच्या ठिकाणावरून कोणतेही बोटांचे ठसे, डंप डेटा किंवा इतर कोणतीही माहिती गोळा करण्यात आली नाही, असं न्यायालयाने म्हटले आहे.नमुने देखील खराब झाले होते, त्यामुळे अहवाल निर्णायक आणि विश्वासार्ह असू शकत नाही. स्फोटात सहभागी असलेल्या बाईकचा चेसिस नंबर स्पष्ट नव्हता. स्फोटापूर्वी ती प्रज्ञासिंह यांच्या ताब्यात होती हे सरकारी वकिलांना सिद्ध करता आले नाही.

**विशेष एनआयए न्यायालय, मुंबई.**

# राजकीय बदनामीच्या षड्यंत्राचा पर्दाफाश

## काँग्रेसने हिंदूंची माफी मागावी, भाजपाचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह सर्व ७ जणांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. भाजपाने मालेगाव निकालावरून काँग्रेसवर निशाणा साधला आहे. आजच्या निर्णयाने हिंदूंना बदनाम करणाऱ्यांना मोठी चपराक मिळाली. काँग्रेसनेहिंदू समाजाची माफी मागायला हवी असं म्हणत हल्लाबोल केला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्वीट केलं आहे. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील विशेष एनआयए न्यायालयाचा निकाल केवळ न्यायालयीन निर्णय नाही, तर तो एका दीर्घकाळ चाललेल्या राजकीय बदनामीच्या षड्यंत्राचा पर्दाफाश आहे. सर्व आरोपांमागे कोणताही ठोस पुरावा नाही, हे न्यायालयाने स्पष्टपणे नोंदवलं. पण याहून गंभीर




बाब म्हणजे काँग्रेसने जाणीवपूर्वक हिंदू दहशतवाद हा शब्दप्रयोग प्रचारात वापरत हिंदू समाजाला, श्रद्धेला, जगभरात बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

शतकानुशतकं मानवतेचं आणि सहिष्णुतेचं प्रतीक असलेल्या हिंदू धर्माला दहशतवाद्यांच्या रांगेत उभं करण्याचा अक्षम्य गुन्हा काँग्रेसने केला. आज कोर्टाने सत्य मांडलं, आता काँग्रेसनं हिंदू समाजाची माफी मागायला हवी! हिंदू कधीच दहशतवादी नव्हता आणि नसेलही न्यायालयाच्या आजच्या निर्णयाने हिंदूंना बदनाम करणाऱ्यांना मोठी चपराक मिळाली आहे असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे.

# काँग्रेसने संपूर्ण हिंदू समाजाची माफी मागावी

## मालेगाव निकालावर मुख्यमंत्री फडणवीसांचं रोखठोक मत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

देशातील अतिशय चर्चेत राहिलेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात एक मोठी अपडेट समोर आली आहे. आज NIAच्या विशेष न्यायालयाने या प्रकरणी मोठा निकाल दिला. न्यायालयाने प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह सर्व ७ आरोपींना या प्रकरणातून निर्दोष मुक्त केले. मालेगावमध्ये स्फोट झाल्याचे सरकारी वकिलांनी सिद्ध केले, परंतु त्या मोटारसायकलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता हे सिद्ध करू शकले नाहीत. जखमींचे वय १०१ नाही तर ९५ वर्षे होते आणि काही वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये छेडछाडदेखील करण्यात आली होती. त्यामुळे सबळ पुराव्यांअभावी या सर्वांना निर्दोष मुक्त करण्याचा निष्कर्ष न्यायालयाने काढला आहे, असे निकाल वाचताना NIA कोर्टाचे न्यायाधीश म्हणाले. या निकालानंतर, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली.

काही राजकीय मंडळींनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात भगवा दहशतवाद असा उल्लेख




करत या गुन्हेगारांना हिंदू धर्माशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. त्या सर्वांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात उत्तर दिले. देवेंद्र फडणवीस यांनी मालेगाव स्फोटातील आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर एक ट्विट केले. या ट्विटमधून त्यांनी सर्वांनाच एक स्पष्ट संदेश दिला. भगवा दहशतवाद हा कधीच अस्तित्वात नव्हता, आता नाहीये आणि यापुढे कधी असणार नाही, असे एका वाक्यात ट्विट करत त्यांनी निकालावर पहिली प्रतिक्रिया दिली.

हिंदू दहशतवादाचा आणि भगव्या दहशतवादाचा खोटा नरेटिव्ह काँग्रेसप्रणित सरकारने सेट करण्याचा प्रयत्न केला होता. निवडणुकीमध्ये अल्पसंख्याकांचे लांगुलचालन करण्याकरता हिंदू आतंकवाद किंवा भगवा आतंकवाद असा प्रचार करण्यात आला होता, तो किती खोटा होता हे आज उघड झाले आहे. ज्या प्रकारे षडयंत्र रचून भगवा आतंकवाद दाखवण्याचा काँग्रेसने प्रयत्न केला, ते पाहता ज्यांच्यावर त्यांनी कारवाई केली; त्यांची तर त्यांनी माफी मागितलीच पाहिजे. पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे संपूर्ण हिंदू समाजाची काँग्रेसने माफी मागितली पाहिजे. ज्या प्रकारे हिंदू आतंकवाद म्हणून संपूर्ण हिंदू समाजाला वाईट दाखवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, त्याबद्दल काँग्रेसने जाहीरपणे माफी मागितली पाहिजे, अशी रोखठोक भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी मांडली.

# सत्तेतील तणाव वाढला? शिंदे दिल्लीत, शहांसोबत गुप्त भेट

## अंतर्गत नाराजी अन् निवडणूक रणनितीवर खलबते सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची पार्श्वभूमी आणि विविध राजकीय घडामोडी लक्षात घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी अचानक दिल्ली दौरा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीहून परतल्यानंतर लगेचच शिंदे यांनी भाजपच्या काही वरिष्ठ नेत्यांची भेट घेतल्याची माहिती मिळाली आहे. या दौऱ्यामागे सुरू असलेल्या विविध चर्चांना उधाण आले आहे.

शिंदे यांच्या गटातील काही मंत्री आणि आमदार सध्या वादग्रस्त प्रकरणांमध्ये अडकलेले आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील भेटीत पक्षाच्या प्रतिमेच्या संदर्भात भाजपकडून काही स्पष्ट सूचना देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या शिवसेना पक्षा वरच्या खटल्याची येणारी सुनावणी, मंत्र्यांवरील प्रकरणे आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी या मुद्द्यांवरही चर्चा झाल्याचे समजते.

दिल्लीमध्ये सध्या संसदेचे



पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाच्या अनुषंगाने एकनाथ शिंदे हे पक्षाच्या खासदारांची बैठक घेणार आहेत. या बैठकीत अधिवेशनात मांडायच्या मुद्द्यांबाबतही चर्चा होणार असून, पक्षाच्या आगामी रणनीतीबाबतही दिशा दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे इतर राज्यांतील शिवसेना पदाधिकाऱ्यांशी देखील ते संवाद साधणार आहेत.

या दौऱ्यामुळे शिंदे गटात हालचाली वाढल्या असून, सर्वोच्च न्यायालयात अपेक्षित असलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आगामी राजकीय स्थितीबाबत तयारी सुरू असल्याचे मानले जात आहे. राज्यात अनेक मंत्री वादग्रस्त ठरत असताना आणि सरकारवर विरोधकांकडून टीका होत असताना, भाजप व शिंदे गट यांच्यातील संवाद महत्त्वाचा मानला जात आहे.

### खासदारांच्या बैठकीसाठी दौरा

एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्याबाबत मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे प्रत्येक अधिवेशनाला आपल्या खासदारांना भेटायला आणि त्यांची बैठक घेण्यासाठी दिल्लीला जात असतात. तसेच ते काही राज्य प्रमुखांच्या भेटी सुद्धा घेणार आहेत असे सामंत म्हणाले.

# मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालावर ठाकरे गटाची प्रतिक्रिया

## 'सत्यमेव जयते' असे म्हणत अंबादास दानवे यांनी केली पोस्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१छत्रपती संभाजीनगर**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व आरोपींना निर्दोष ठरवण्यात आले आहे. या निकालानंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या नेत्याची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. या संदर्भात 'सत्यमेव जयते' असे म्हणत विधान परिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.



मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणानंतर तत्कालीन काँग्रेस सरकारच्या वतीने 'हिंदू दहशतवाद' असा शब्दप्रयोग करण्यात आला होता. त्यामुळे देशात काँग्रेस विरुद्ध हिंदू समाजामध्ये संतापाची लाट पसरली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांची एकत्र शिवसेना ही भाजपसोबत होती. या शब्दप्रयोगाचा विरोध त्या वेळी युतीच्या माध्यमातून करण्यात आला होता.

त्यानंतर आता या प्रकरणाचा सतरा वर्षांनंतर निकाल समोर आला आहे. त्यातच उद्धव ठाकरे यांची शिवसेना सध्या काँग्रेस सोबत महाविकास आघाडीमध्ये आहे. असे असताना या प्रकरणाबाबत शिवसेनेची प्रतिक्रिया अद्याप समोर आली नव्हती. त्यात आता अंबादास दानवे यांनी सत्यमेव जयते म्हणत या प्रकरणावर सूचक प्रतिक्रिया दिली आहे.

### सत्य कधी पराभूत होत नाही -एकनाथ शिंदे

सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकरणी म्हणाले की, सतरा वर्षांच्या दीर्घ लढाईनंतर मालेगाव बॉम्बस्फोटातील सात कथित आरोपींची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. न्यायाला उशीर झाला हे खरं आहे, पण सत्य कधीही पराजित होत नसतं, हे पुन्हा एकवार सिध्द झालंय.




मालेगावच्या स्फोटांप्रकरणी खोटे आरोप करून तुरुंगात डांबण्यात आलेल्या देशभक्तांना शिवसेनेनं पहिल्यापासूनच निसंदिग्ध पाठिंबा दिला होता. कारण आपली बाजू न्यायाची आहे, याबद्दल शिवसेनेला कधीही संदेह नव्हता. कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा आदी सात जणांना या आरोपामुळे प्रचंड मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागलाय.

हा अन्याय हिंदू जनता कधीही विसरणार नाही. हिंदू कधीही देशविरोधी कृत्यं करू शकत नाही, कारण देशभक्ती हे हिंदूधर्मीयांसाठी धर्मकार्यच असतं. 'हिंदू दहशतवाद' नावाचा भंपक शब्द काँग्रेसी षड्यंत्रकारी नेत्यांनी चलनात आणला. याच्यासारखा धादांत त्यांच्यापाशी आता काय उत्तर आहे?एक काळंकुट्ट पर्व आज संपलंय. हिंदू धर्मीयांवरचा कलंक पुसला गेलाय. 'गर्व से कहो हम हिंदू हैं' ही घोषणा आता शंभरपट मोठ्या आवाजात देशभर दुमदुमेल, यात शंका नाही. सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं! जय हिंद, जय महाराष्ट्र, असे शिंदे यांनी म्हटले आहे.

# अखेर कोकाटेंना रमीचा डाव भोवला कृषी खातं काढून घेतलं जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

गेल्या अनेक दिवसांपासून राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे चांगलेच चर्चेत होते. पावसाळी अधिवेशन चालू असताना ते सभागृहात ऑनलाईन रमी गेम खेळताना आढळले होते. ते गेम खेळताचा व्हिडीओही सगळीकडे व्हायरल झाला होता. दरम्यान, हा कोकाटेंच्या या कृतीमुळे विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. सरकारवर मोठा दबाव वाढला होता. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच मोठा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखातं काढून घेतलं जाणार आहे.



गेल्या काही दिवसांपासून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी केली जात होती. त्यासाठी राज्यभर आंदोलनेही झाली. विरोधकांचा आणि जनतेचा पवित्रा लक्षात घेता आता मोठा निर्णय घेण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. लवकरच माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषीखाते काढून घेतले जाणार आहे, असे सूत्रांनी सांगितले आहे. त्यांच्या खात्याचा कारभार अन्य नेत्याकडे सोपवला जाणार आहे, अशी माहिती मिळत आहे.

नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्यात बैठक झाली आहे. या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. कोकाटे यांचा थेट राजीनामा घेण्याऐवजी त्यांच्यावर अन्य खात्याची जबाबदारी सोपवली जाईल, असे सांगितले जात आहे.

# मुलीचे व्हिडीओ पाठवत प्रांजल खेवलकरांचा मेसेज, आक्षेपार्ह चॅटही सापडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१पुणे :**

ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. प्रांजल खेवलकर यांच्या फोनमध्ये आक्षेपार्ह व्हिडीओ आणि चॅट सापडल्याची माहिती पुणे पोलिसांनी न्यायालयात दिली. प्रांजल खेवलकर याने एका मुलीचे व्हिडीओ दुसऱ्या आरोपीला पाठवत 'ऐसा माल चाहिए' असा मेसेज केल्याचं समोर आलं आहे. तर प्रांजल खेवलकरांना खोट्या प्रकरणात अडकवण्यात आलं असून ज्या दोन महिलांना न्यायालयीन कोठडी दिली आहे त्यांना या कामाबद्दल बक्षीस




दिल्याचा आरोप केला.

पुण्यातील ड्रग्ज पार्टी प्रकरणी रोहिणी खडसे यांच्या पतीला अटक करण्यात आली आहे. त्यांच्यासोबत इतर सहा जणांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी दोन महिलांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. तर पाच आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. ती कोठडी संपल्याने या आरोपींना पुन्हा एकदा न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं. त्यामध्ये आता त्यांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.ज्येष्ठ नेते एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांना पुण्यात ड्रग्ज पार्टीत अटक झाली. आता या प्रकरणाची इनसाईड स्टोरी एबीपी माझाच्या हाती लागली आहे. पार्टी करण्याची हौस असलेल्या प्रांजल खेवलकरांच्या संपर्कात काही दिवसांपूर्वी श्रीपाद यादव आणि निखिल पोपटाणी हे दोघे आले. या दोघांचीही पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे. श्रीपाद यादववर या आधी बेटींग प्रकरणात गुन्हे दाखल असून त्याला अनेकदा अटक देखील झाली आहे. तर निखिल पोपटाणी हा सिगारेटचा व्यवसाय करत असला तरी तो देखील बेटींगच्या दुनियेत बुकी म्हणून ओळखला जातो.

संपादकीय ......

# जागतिक व्यापारातील नवा भारत

*जगाचे आर्थिक आणि व्यापारी समीकरण सध्या एका निर्णायक संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. अमेरिका-चीन संघर्ष, युरोपमधील ऊर्जा संकट, ब्रेक्झिट'नंतरचा युरोपियन व्यापाराचा नव्याने उलगडणारा चेहरा आणि कोरोनानंतरच्या पुरवठा साखळीतील खंडित प्रवाह, यामुळे जगभरातील राष्ट्रांना नव्याने अर्थनीती आखावी लागली आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताने परराष्ट्र व्यापार धोरणामध्ये जे बदल घडवून आणले आहेत, ते रणनीतीपूर्वक आणि काळाची गरज लक्षात घेऊन उभे राहिलेले दिसतात.*

*जगाच्या अर्थकारणात झपाट्याने बदल होत असताना भारताने अलीकडच्या काळात परराष्ट्र व्यापार धोरणात जे बदल घडवून आणले आहेत, ते निश्चितच दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे आहेत. युरोपियन युनियन, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड अशा प्रमुख जागतिक अर्थव्यवस्थांसोबत मुक्त व्यापार करार करण्याच्या दिशेने भारताने सुरू केलेली पावले केवळ कागदी करारांपुरती मर्यादित नसून, ही एक दीर्घकालीन आर्थिक रणनीती म्हणून समजायला हवी. विशेषतः, देशांतर्गत उद्योगांना जागतिक बाजारात नेण्याचा जो प्रयत्न सरकारने या करारांद्वारे सुरू केला आहे, त्यातून 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या योजनांचा खर्या अर्थाने लाभ मिळणार आहे. भारत आणि ब्रिटन (यूके) यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार करारानंतर आता भारत युरोपियन युनियन व अमेरिकेसह व्यापार करार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. यामुळे भारताचे जागतिक व्यापारातील स्थान अधिक बळकट होत असून, देशांतर्गत उद्योगांना विदेशी बाजारपेठेत विस्ताराची संधी मिळत आहे. विशेषतः, ऑस्ट्रेलिया, युरोपियन युनियन, अमेरिका यांच्यासह १२ देशांसोबत व्यापार कराराच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.भारताचा सर्वाधिक द्विपक्षीय व्यापार अमेरिका, चीन, संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, हाँगकाँग, नेदरलँड, सिंगापूर, जर्मनी, इंडोनेशिया आणि बेल्जियम यांच्याशी आहे. यातील अनेक देशांसोबत व्यापार करार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये युरोपियन युनियन, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इस्त्रायल, रशिया, नॉर्वे, स्वित्झर्लंड, दक्षिण कोरिया, जपान, अमेरिका, थायलंड आणि संयुक्त अरब अमिरात हे देश आहेत. ऑस्ट्रेलियासोबतचा व्यापार करार नुकताच अंतिम झाला असून, त्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापार वाढणार आहे. २०२०-२१ मध्ये भारत-ऑस्ट्रेलिया व्यापार ४,४४३.८८ कोटी होता, जो २०२१-२२ मध्ये ८,२८३.१३ कोटींवर गेला. २०२२-२३ मध्ये तो ६,९५१.३२ कोटी, २०२३-२४ मध्ये ७,९४०.७५ कोटी आणि २०२४-२५ मध्ये ८,५७८.८४ कोटींचा अंदाज आहे. हे आकडे दर्शवतात की, या करारामुळे व्यापारात लक्षणीय वाढ झाली आहे.भारताचे सर्वात मोठे द्विपक्षीय व्यापारी देश म्हणजे अमेरिका (१३१.८४ अब्ज डॉलर), चीन (१२७.७), संयुक्त अरब अमिरात (१००.५), सौदी अरेबिया (४८.३२), हाँगकाँग (४४.३७), नेदरलँड (२५.९५), सिंगापूर (३३.८६), जर्मनी (३२.७), इंडोनेशिया (२५.६८), बेल्जियम (२५.३५) आणि ऑस्ट्रेलिया (२४) हे आहेत. या सर्व देशांसोबत व्यापार करार झाल्यास देशांतर्गत उद्योगांना मोठी चालना मिळणार आहे. या व्यापार करारांमुळे भारतातील लघू व मध्यम उद्योग, उत्पादन क्षेत्र, निर्यातदार यांना जागतिकस्तरावर पोहोच मिळणार आहे. देशांतर्गत वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळू शकतो. यातून भारतातील रोजगारनिर्मिती वाढण्याची शक्यता आहे. तसेच, परदेशी गुंतवणूक वाढून देशाच्या एकूण आर्थिक विकासात मोठा हातभार लागण्याची शक्यता आहे.युरोपियन युनियनसोबतचा करार पूर्णत्वास नेण्यासाठी भारत आणि युरोपीय देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत. हा करार अंतिम झाल्यास भारताला युरोपीय बाजारपेठेत सुलभ प्रवेश मिळेल. तसेच, अमेरिकेसोबतही व्यापार कराराच्या शक्यता असून, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस एक अमेरिकन शिष्टमंडळ भारत भेटीवर येणार असल्याचे सांगितले जात आहे.*

*२०१९-२० च्या तुलनेत २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताच्या एकूण निर्यातीत २२.८ टक्क्यांची वाढ झाली आहे. यामध्ये सेवा निर्यातीचा वाटा ३३.४ टक्क्यांवर पोहोचला असून, सॉफ्टवेअर, आरोग्य, शिक्षण, वित्तीय सल्लागार सेवा आणि तंत्रज्ञानआधारित उपाययोजना यांचा मोठा वाटा आहे. फेब्रुवारी २०२५ अखेरपर्यंत भारताचे एकूण परकीय व्यापाराचे मूल्य १.७८ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले आहे, ज्यामध्ये निर्यात ७४८ अब्ज डॉलर आणि आयात १.०३ ट्रिलियन डॉलर एवढी आहे. विशेषतः, भारताचा अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबतचा व्यापार गेल्या दोन वर्षांत सरासरी १८ टक्क्यांनी वाढलेला आहे. या व्यापार करारांमुळे भारतीय उत्पादनांना नवीन ग्राहक, नवीन बाजारपेठा आणि नवीन संधी मिळत आहेत. विशेषतः, लघू, मध्यम व सूक्ष्म उद्योगांना (एमएसएमई) यामुळे मोठा फायदा होईल.*

# माती तपासणी प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी मिळतंय दीड लाखाचे अर्थसहाय्य; कुठे कराल अर्ज ?

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक-** राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता मिळाली असून, जिल्हा कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले आहेत.

राष्ट्रीय कृषी विकास योजना कॅफेटेरिया अंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम सन २०२५-२६ साठी २ लाख २२ हजार मृद नमुने ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळेकडून तपासणी करण्याबाबत सन २०२५-२६ च्या राज्याच्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये मान्यता दिली आहे.

सन २०२५-२६ चे राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखड्यामध्ये राज्यासाठी एकूण ४४४ नवीन ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा उभारण्यासाठी मंजुरी मिळालेली आहे. कृषी संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषी आयुक्तालय पुणे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय मृद नमुने मान्यता दिली आहे.केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर प्रयोगशाळा उभारण्यासाठी अर्थसहाय्य खासगी व्यक्ती, शेतकरी उत्पादक संस्था, कृषी चिकित्सालये आणि कृषी व्यावसायिक केंद्रे, माजी सैनिक बचत गट, शेतकरी सहकारी संस्था, कृषी आवश्यक सेवा, निविष्ठा किरकोळ विक्रेते, तसेच शाळा/कॉलेज, युवक-युवती यांना दिले जाणार आहे.लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले जात असून, इच्छुकांना ८ ऑगस्टपर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करता येणार आहेत.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

ग्रामस्तरीय मृद चाचणी प्रयोगशाळेसाठी अर्थसाहाय्य रक्कम १ लाख ५० हजार रुपये आहे.

**प्रयोगशाळेसाठी लाभार्थी निवड निकष-** लाभार्थी युवक/युवती १८ ते २७ वयोगटातील असावा.

स्वयंसहायता गट, शेतकरी उत्पादक संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था हे अर्ज करू शकतात. लाभार्थ्यांची शैक्षणिक अर्हता किमान १० वी (विज्ञान विषयासह) उत्तीर्ण असावी. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेसोबत आधार कार्ड व पॅन कार्ड जोडणे आवश्यक आहे. अर्जदार/गटाची स्वतःची इमारत किंवा किमान ४ वर्षांचा भाडेकरार असलेली इमारत असणे आवश्यक आहे. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय निवड समितीकडून सोडत काढून लाभार्थ्यांची अंतिम निवड केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.




## रक्तातील साखर नियंत्रणात ठेवायची आहे तर मग प्या 'हे' हेल्दी ड्रींक्स



**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी औषधांसोबतच काही नैसर्गिक आणि आरोग्यदायी पेयांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मोठी मदत होऊ शकते. मधुमेह ही एक अशी जीवनशैलीशी निगडित समस्या आहे, ज्यामध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. यासाठी केवळ औषधोपचार पुरेसे नाहीत, तर योग्य आहार आणि नियमित व्यायाम यांचीही जोड आवश्यक असते. तुमच्या रोजच्या आहारात काही नैसर्गिक आणि आरोग्यदायी पेयांचा समावेश करून तुम्ही रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवू शकता. चला तर मग जाणून घेऊया अशा ६ आरोग्यदायी पेयांविषयी, जी मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकतात.

**१. कारल्याचा रस** - कारल्याला मधुमेहावर एक नैसर्गिक औषध मानले जाते. यामध्ये 'पॉलीपेप्टाइड-पी' नावाचे एक संयुग असते, जे इन्सुलिनप्रमाणे काम करते आणि नैसर्गिकरित्या रक्तातील साखर कमी करण्यास मदत करते.

**२ मेथीचे पाणी-** मेथीच्या दाण्यांमध्ये भरपूर प्रमाणात विरघळणारे फायबर (डेर्श्रीलश्रश ऋळलशी) असते. हे फायबर पचनक्रिया मंदावते आणि शरीरातील साखरेचे शोषण नियंत्रित करते, ज्यामुळे रक्तातील साखर लगेच वाढत नाही.

**३ दालचिनीचे पाणी** - दालचिनी हा एक असा मसाला आहे, जो शरीरातील इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवण्यास मदत करतो. यामुळे पेशी ग्लुकोजचा अधिक प्रभावीपणे वापर करतात आणि रक्तातील साखरेची पातळी कमी होते.

**ग्रीन टी** -साखरेशिवाय बनवलेली ग्रीन टी मधुमेहाच्या रुग्णांसाठी एक उत्तम पर्याय आहे. यामध्ये 'कॅटेचिन' नावाचे अँटीऑक्सिडंट असतात, जे शरीराला इन्सुलिनचा योग्य वापर करण्यास मदत करतात.

**भाज्यांचा रस-** फळांच्या रसाऐवजी भाज्यांचा रस पिणे मधुमेहींसाठी अधिक फायदेशीर आहे, कारण त्यात साखरेचे प्रमाण नगण्य असते आणि फायबर भरपूर प्रमाणात असते. टोमॅटो, काकडी, पालक आणि दुधी भोपळा यांसारख्या भाज्यांचा रस पिणे आरोग्यासाठी उत्तम आहे.

**साधे पाणी** - हे सर्वात सोपे पण तितकेच महत्त्वाचे पेय आहे. दिवसभर पुरेसे पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेटेड राहते. यामुळे मूत्रपिंडांना (किडनी) रक्तातील अतिरिक्त साखर मूत्रावाटे बाहेर टाकण्यास मदत मिळते.

# शून्य कचरा अमरावतीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

## महानगरपालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती-** अमरावती महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान व क्षमता बांधणी अंतर्गत नियुक्त स्वच्छता नॉलेज पार्टनर फीडबॅक फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारे घटक (ईीश्रज्ञ थरींीश ऋश्रपशीर-ीी- इथऋी) यांच्यासाठी तीन दिवसांच्या विशेष क्षमतावर्धन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून, आज दिनांक ३० जुलै २०२५ रोजी या कार्यशाळेच्या पहिल्या दिवसाचा यशस्वी प्रारंभ करण्यात आला.

सदर कार्यशाळेचे उद्घाटन अमरावती महानगरपालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मनपा आयुक्त महोदयांचे स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके यांच्या हस्ते रोप भेट देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शून्य कचरा अमरावती या दीर्घकालीन संकल्पनेचा उल्लेख करत, कचरा व्यवस्थापनाच्या साखळीतील मूळ टप्पा असलेल्या स्रोतस्तरावरील कचरा वर्गीकरण यावर भर दिला. त्यांनी शहरातील प्रत्येक घटकाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतल्यास अमरावतीला कचरा मुक्त शहर म्हणून स्थापित करता येईल, असे मत व्यक्त केले.

तत्पूर्वी, मनपा अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी कार्यशाळेला संबोधित करताना अमरावती महानगरपालिकेच्या विविध स्वच्छ भारत अभियान उपक्रमांविषयी आणि प्राप्त झालेल्या यशांविषयी माहिती दिली. .

त्यांनी सांगितले की, स्वच्छ भारत मिशन, स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मध्ये अमरावती शहराने देशात १८ वा व महाराष्ट्रात १७ वा क्रमांक मिळवला असून, कचरा मुक्त शहर श्रेणीमध्ये १ स्टार रेटिंग तसेच थरींशी झर्श्री प्रामाणिकरण प्राप्त केले आहे, हे अमरावतीच्या समर्पित व सुसंगत प्रयत्नांचे फलित आहे.

सदर प्रशिक्षण सत्रात विवाह सभागृहे, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, लॉन्स, बार असोसिएशन तसेच विविध औद्योगिक व व्यापारी घटकांचे प्रतिनिधी सहभागी झाले असून, पहिल्या दिवशी एकूण ७२ सहभागी उपस्थित होते.

प्रत्येक सहभाग्यास प्रशिक्षण साहित्य संच- बॅग, नोटपॅड, पेन, पेन्सिल व स्टीलची पाण्याची बाटली प्रदान करण्यात आली. तसेच कार्यशाळेनंतर सर्व सहभाग्यांसाठी अल्पोपहाराचेही आयोजन करण्यात आले.

प्रशिक्षण सत्रात फीडबॅक फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट, गुरुग्राम हरियाणा चे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय सिन्हा यांनी शून्य कचरा व्यवस्थापन, स्रोतस्तरावरील कचरा वर्गीकरण, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, तसेच नियम व प्रक्रियांचे सविस्तर मार्गदर्शन केले. यासोबतच फीडबॅक फाउंडेशन संस्थेचे प्रतिनिधी श्री. ज्योती प्रकाश व डॉ. हरभजन सिंग यांनीही सहभागी घटकांना तांत्रिक बाबींचे विश्लेषण व कृतीशील उपायांची माहिती दिली.

महानगरपालिकेच्या वतीने सहायक आयुक्त श्री. भूषण पुसतकर व स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव कार्यशाळेत उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक श्री. प्रसाद कुलकर्णी यांची विशेष भूमिका राहिली. तसेच फीडबॅक फाउंडेशन तर्फे श्री. राहुल, श्री. इंद्रजित व श्री. मयूर यांनी कौतुकास्पद समन्वय साधला.

ही कार्यशाळा तीन दिवसांची असून, पुढील दोन दिवसांत इतर श्रेणीतील मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या घटकांसाठी प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून महानगरपालिकेचा उद्देश शाश्वत व नागरिक सहभागावर आधारित कचरा व्यवस्थापन प्रणाली निर्माण करणे हाच आहे.

# इतवारा बाजारातील अतिक्रमणावर महा नगर पालिकेची धडक कारवाई; दोन ट्रक साहित्य जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

महानगरपालिका अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाने संयुक्तपणे बुधवारी इतवारा बाजार परिसरात मोठी अतिक्रमणांवर मोहीम राबवली. परिसरातील व्यापाऱ्यांनी सार्वजनिक नाल्यांवर केलेल्या शेड, काँक्रीट सिमेंटच्या रपट्या व लोखंडी खोके यांसारख्या अतिक्रमणांमुळे नाली सफाईस अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे सार्वजनिक नाल्यांचे सांडपाणी रस्त्यावर येण्याची वेळ येत होती.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार ही कारवाई ३० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत करण्यात आली. जे.सी.बी. मशीनच्या सहाय्याने अतिक्रमण हटवण्याचे काम युद्धपातळीवर पार पाडण्यात आले.

सदर कारवाईमध्ये झोन क्रमांक १ चे सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, झोन क्रमांक २ चे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख योगेश कोल्हे, निरीक्षक अन्सार अहमद, स्वच्छता निरीक्षक सचिन सैनी, पोलीस कर्मचारी व इतर विभागीय कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

या मोहिमेदरम्यान दोन ट्रक भरून अतिक्रमणाचे साहित्य जप्त करण्यात आले असून, पुढील कारवाईसाठी संबंधित व्यापाऱ्यांना नोटीस देण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

गुरुवार दि. ३१ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# दर्यापूर नगरपरिषदचा अजब कारभार!

## सार्वजनिक रस्ते म्हैस बांधण्यासाठी, शेणखतामुळे बालगृहातील मुलांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१दर्यापूर**

दर्यापूर नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालली असून, सार्वजनिक रस्त्यांचा वापर रस्ते म्हणून न करता म्हशी बांधण्यासाठी आणि शेणखत साचवण्यासाठी होतो आहे. विशेष म्हणजे, स्वर्गीय नंदलाल भट्टड यांनी श्री संत गाडगे महाराज मिशन मुंबई मार्फत संचालित श्री संत गाडगे महाराज बालगृह, बनोसा-दर्यापूर या संस्थेला दान दिलेल्या 'रतन बिल्डिंग' शेजारील परिसरातच या प्रकाराची गंभीर तक्रार समोर आली आहे.



बिल्डिंगच्या शेजारी राहणारे बंडू पाटील काळे यांच्या शेणखत प्रक्रिया मशीनमुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी, घाणीचे साम्राज्य व कीटकांचा उपद्रव वाढलेला आहे. यामुळे बालगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. बालाजी मंदिराकडे, मेन रोडकडे तसेच शिरभाते, मलिये व नितीन दुधाटे यांच्या घराकडे जाणारे तिन्ही मुख्य रस्ते शेणखतात बुडाले असून, त्या मार्गांवरून चालणेही अशक्य झाले आहे.

**नगरपरिषदेचे दुर्लक्ष:**

आरोग्य अधिकारी श्री. देशमुख यांनी केवळ फवारणी करून जबाबदारी निभावल्याचा देखावा केला. मात्र प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ औपचारिकता म्हणून काम केल्याने नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.

याआधीही १ मे २०२३ रोजी सामाजिक कार्यकर्ते गजानन देशमुख यांनी या समस्येवर अमरण उपोषण केले होते, त्यावेळी तत्कालीन मुख्याधिकारी पराग वानखेडे यांनी एक महिन्यात उपाययोजना करण्याचे आश्वासन देत उपोषण मागे घेण्यास भाग पाडले. मात्र त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

### माजी विद्यार्थ्यांचा संताप - १५ ऑगस्टपासून आंदोलनाचा इशारा

बालगृहाचे माजी विद्यार्थी श्रीकांत (गोलू) पळघामोळ, राहुल ठाकरे आणि आकाश सोनोने यांनी आता या प्रश्नावर आवाज उठवत नगरपरिषदेकडे तक्रार दिली असून, खासदार बळवंत वानखेडे यांच्याकडे देखील तोंडी तक्रार करण्यात आली आहे. नवीन मुख्याधिकारी यांच्याकडून अद्याप कारवाई झालेली नाही. त्यामुळे याच माजी विद्यार्थ्यांनी १४ ऑगस्टपासून दर्यापूर नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

### एकच मागणी - सार्वजनिक रस्ते 'म्हैस-मुक्त' आणि 'शेणखत-मुक्त' करा!

नागरिकांच्या, विशेषतः बालगृहातील मुलांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या नगरपरिषदेच्या हलगर्जी कारभारावर आता कठोर उपाययोजना आवश्यक आहे, अन्यथा येणाऱ्या स्वातंत्र्य दिनी दर्यापूर नगरपरिषदेला तीव्र जनआंदोलनाला सामोरे जावे लागेल.-

# अमरावती जि.प. व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर १४५ आक्षेप

## चेंडू विभागीय आयुक्तांच्या कोर्टात, ८ ऑगस्टपर्यंत प्रक्रिया : सर्वाधिक ४९ हरकती बुलढाणा जिल्ह्यात




**जिल्हानिहाय आक्षेप**

| | |
|---|---|
| अमरावती | - १८ |
| यवतमाळ | - २९ |
| अकोला | - ३२ |
| वाशिम | - १७ |
| बुलढाणा | - ४९ |
| एकूण | - १४५ |

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांमधून एकूण १४५ आक्षेप आणि हरकती दाखल झाल्या असून, त्यावरील अंतिम निर्णयाचा चेंडू सध्या विभागीय आयुक्तांच्या कोर्टात आहे. ८ ऑगस्टपर्यंत जिल्हानिहाय सुनावण्या होणार असून, ११ ऑगस्टला अंतिम निर्णय अपेक्षित आहे.

२८ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी आक्षेपांसह आपापले प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर केले आहेत. त्यानुसार १८ ऑगस्टला अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांकडे पाठवण्यात येणार आहे.

यानंतर आरक्षण सोडत, मतदार यादीतील सुधारणा यांची प्रक्रिया पार पडल्यानंतर सप्टेंबर महिन्यात सार्वत्रिक निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेचे गट व पंचायत समिती गणासंदर्भात १४ जुलै रोजी जिल्हाधिकारी यांनी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली होती.

यामध्ये सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाचे नाव त्या गणाला व गटाला देण्यात आलेले आहे.शिवाय ग्रामविकास विभागाने दिलेल्या सूत्रानुसार गटाची निश्चिती करण्यात आली. यामध्ये अमरावती जिल्ह्यात ५९, अकोला ५२, वाशिम ५२, बुलढाणा ६१ व यवतमाळ जिल्ह्यात ६२ गट निश्चित करण्यात आलेले आहेत.

### अशा आहेत जिल्हानिहाय सुनावणी

माहितीनुसार २९ ते ३१ जुलै दरम्यान बुलढाणा जिल्हा, १ ऑगस्टला अमरावती जिल्हा, ४ ऑगस्टला वाशिम जिल्हा, ५ व ६ ऑगस्टला अकोला जिल्हा तसेच ७ व ८ ऑगस्टला यवतमाळ जिल्ह्यातील आक्षेप हरकतींवर विभागीय आयुक्त सुनावणी घेतील. त्यानंतर १८ ऑगस्टला प्रभाग रचनेचा प्रस्ताव अंतिम करण्यात येऊन राज्य निवडणूक आयुक्तांना पाठविण्यात येणार आहे.

# अठरा महिन्याच्या बालकावर चुकीचे लसीकरण

## आरोग्य सेविकेचे राक्षसी कृत्य, जाब विचारणाऱ्या वडिलांना धमकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नांदगाव पेठ** येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, माहुली जहांगिर अंतर्गत नांदगाव पेठ उपकेंद्रात नुकत्याच रुजू झालेल्या आरोग्य सेविका अर्चना ढोले यांनी अठरा महिन्याच्या निरागस बालकावर चुकीच्या पद्धतीने लसीकरण करून त्याच्या जीवाशी खेळल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. लसीकरणानंतर त्या बालकाच्या पायावर मोठी गाठ आली, ताप वाढला आणि संपूर्ण रात्रभर बाळ वेदनेत तडफडत राहिले. यासंदर्भात विचारणा करताच संबंधित आरोग्य सेविकेच्या पती व मुलांनी बाळाच्या वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी एकमुखीने संबंधित आरोग्य सेविकेला तात्काळ सेवेतून निलंबित करण्याची तसेच नांदगाव पेठ उपकेंद्रातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.




१७ जुलै रोजी किशोर सुरेश तायडे यांच्या पत्नीने त्यांच्या अठरा महिन्याच्या बाळाला अंगणवाडी येथे लसीकरणासाठी नेले असता, आरोग्य सेविका अर्चना ढोले यांनी निष्काळजीपणे आणि जबरदस्तीने तीन वेळा इंजेक्शन टोचले. यामुळे बाळाला गंभीर त्रास होऊन लस टोचलेल्या भागावर मोठी गाठ आली आणि दोन दिवस तापाने फणफणला. याबाबत आरोग्य सेविकेला माहिती दिली असता तिने गृहभेट न घेता पालकांना थेट खासगी रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला.खासगी डॉक्टरांनी बाळाच्या त्या गाठीवर शस्त्रक्रियेची शक्यता वर्तविली. या घटनेबाबत स्पष्टीकरण मिळवण्यासाठी तायडे यांनी संबंधित सेविकेशी संपर्क केला असता, तिच्या पतीने उद्धटपणे संवाद साधत, तुम्हाला तुमच्या बाळाचं काय करायचं ते करा, असे म्हणत फोन बंद केला. यानंतर तायडे यांनी मित्रांसह उपकेंद्र गाठले. तेथे झालेल्या चर्चेदरम्यान सेविकेने आपली चूक मान्य करत खर्च उचलण्याची तयारी दर्शवली. परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा संपर्क केला असता ती अनुपस्थित राहून, तिचे पती आणि दोन मुले उपस्थित होते. त्यांनी मोबाईलमध्ये व्हिडीओ शूटिंग करत तायडे यांना आणि त्यांच्या मित्रांना जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकारामुळे तायडे यांनी थेट नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. ही घटना केवळ वैद्यकीय निष्काळजीपणाच नव्हे, तर जबाबदारीच्या ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांवर दहशत निर्माण करण्याचा गंभीर प्रकार आहे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांमध्ये आहे.गावकऱ्यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार, संबंधित आरोग्य सेविकेवर कठोर कारवाई करून तिला निलंबित करण्यात यावे, अन्यथा संपूर्ण गाव एकत्र येऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा किशोर तायडे व गावकऱ्यांनी दिला.

### आरोग्य सेविकेचा पती व मुलांची गुंडागर्दी

पीडित मुलाच्या वडिलांनी २९ जुलै रोजी नांदगाव पेठ येथील आरोग्य उपकेंद्र येथे जाऊन वैद्यकीय अधिकारी व इतर आरोग्य सेविका यांच्याशी चर्चा करत असतांना आरोग्य सेविका ढोले यांच्या पतीने व दोन मुलांनी बाळाचे वडील किशोर तायडे यांची कॉलर पकडून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच एका आरोग्य सेविकेचा हात पकडून तिचा विनयभंग देखील केला.आरोग्य सेविकेच्या पतीची व मुलांच्या गुंडागर्दीने परिसरात असलेले रुग्ण तसेच कर्मचारी दहशतीत वावरत आहे.

### आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा-नितीन हटवार

या प्रकरणी माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार,विनोद डांगे, पालक किशोर तायडे, अविनाश शिंदे,तालुका आरोग्य अधिकारी मनीषा सूर्यवंशी गावकऱ्यांसह आरोग्य उपकेंद्र येथे गेले असता त्याठिकाणी आरोग्य व्यवस्थेचे तीन तेरा वाजल्याचा प्रकार समोर आला. कर्मचारी वेळेत कर्तव्यावर उपस्थित नव्हते तसेच परिसरात अस्वच्छता आढळून आली.घडलेल्या घटनेबाबत संताप व्यक्त करत त्या आरोग्य सेविकेचा तातडीने निलंबित करावे अशी मागणी सुद्धा यावेळी नितीन हटवार यांनी केली.

# अमरावतीत लवकरच ई-बस ; चार्जिंग स्टेशनसाठी १० कोटींची निविदा

## कोंडेश्वर मार्गालगतच्या महसूल जागेवर सुसज्ज इमारत साकारणार, पाच निविदा प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-** मेट्रो शहराच्या धर्तीवर अमरावतीकरांनासुद्धा लवकरच पीएम ई-बस सुविधा मिळणार आहे. केंद्र सरकारच्या निधीतून कोंडेश्वर मार्गालगत सुसज्ज इमारतीसह चार्जिंग स्टेशन साकारले जाणार आहे. त्याअनुषंगाने इमारत बांधकामा साठी महानगरपालिका प्रशासनाने ई-निविदा प्रक्रिया राबविली असून, पाच निविदाधारक स्पर्धेत आहेत. अद्यापपर्यंत शहर अभियंत्यांनी निविदा उघडल्या नाहीत, अशी माहिती आहे.

केंद्र शासनाने अमरावती महानगरपालिकेला नऊ मीटर लांबीच्या ४० ई-बसेस मंजूर केलेल्या आहेत. सात मीटर लांबीच्या १० बसेसला अद्यापही मंजुरी मिळालेली नाही. बडनेरा लगतच्या कोंडेश्वर मार्गावरील ई-क्लास जमिनीवर १० कोटींच्या निधीतून ई-बससाठी सुसज्ज इमारत साकारली जाणार आहे.



येत्या काळात ६ कोटी ७३ लाखांच्या निधीतून चार्जिंग स्टेशन, वीज सबस्टेशन आदी बाबींचा समावेश असून, ही कामे एमएसईडीएल, महानगरपालिका प्रकाश विभागाच्या नियंत्रणात होणार आहे. ई-बसेससाठी राज्य शासनाने महसूलच्या जागेला मान्यता प्रदान केली आहे. जागतिक स्तरावर वाढते प्रदूषण आणि सार्वजनिक वाहतुकीवर होणारा शासनाचा खर्च वाचविण्यासाठी 'ई-व्हेईकल' हा सर्वात चांगला पर्याय आहे. त्यामुळे अमरावती शहरातील अंतर्गत दळणवळणासाठी ई-बस सेवेची प्रतीक्षा नागरिकांनाही लागली आहे.

> ई-बस सुविधेसाठी पाच निविदा प्राप्त झाल्या. इमारत बांधकाम व उर्वरित कामेसुद्धा आता वेगाने होतील. रस्ता सुरक्षा प्राधिकरणाने नव्याने ३५ मार्गांना मान्यता दिली.
> - **लक्ष्मण पावडे,** उपअभियंता, वाहन कार्यशाळा, महानगरपालिका

### आता नागपूरनंतर अमरावतीत ई-बस सेवा

केंद्र शासनाने 'मेट्रोपॉलिटिन' शहरात ई-बस सेवा अनिवार्य केली. नागपूर शहरात ती सुरू झाली आहे. आता अमरावतीत चार्जिंग केंद्राच्या जागेचा तिढा सुटला आहे. शासकीय जागेसंदर्भातील फाइल महसूल मंत्रालयाने मंजूर केली आहे. आता काही दिवसातच ई-बससाठी प्रत्यक्षात इमारत बांधकामाला प्रारंभ होणार असून, किमान या वर्षात तरी ई-बससेवा सुरू होईल, अशी अपेक्षा अमरावतीकरांना आहे.

# विर्शी गावातील महिला मारहाणीचा धक्कादायक प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ वलगाव-** वलगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील विर्शी गावात जागेच्या वादातून एका महिलेला निर्घृण मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.प्राथमिक माहितीनुसार, शारदा बाभुळकर या महिलेवर चार जणांनी एकत्र येऊन प्राणघातक हल्ला केला. यामध्ये तीन पुरुष आणि एक महिला सामील असून, व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की एक महिला हातात काठी घेऊन शारदा बाभुळकर यांना बेदम मारहाण करत आहे. त्याचवेळी अन्य तिघे इसम त्यांच्या केसांना धरून लाथाबुक्क्यांनी मारत असल्याचे व्हिडिओत दिसून येते.हा प्रकार केवळ वैयक्तिक शत्रुत्वातून नव्हे तर जागेच्या जुन्या वादातून घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या मारहाणीमुळे पीडित महिलेच्या शरीराजवळ गंभीर जखमा झाल्या असून, तिला तात्काळ स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.वलगाव पोलीस स्टेशनमध्ये या चारही आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.-



# श्वानांसाठी निवारा केंद्र उभारण्यास सुरूवात

## मनपा आयुक्तांकडून पाहणी; कामांना वेग देण्याचे दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-**

महानगरपालिकेतर्फे रहाटगाव व कोडेश्वर येथे प्राणी निवारा केंद्र उभारणीची कामे जोरात सुरू असून गेल्या ३ ते ४ महिन्यांत ही केंद्रे पूर्णत्वास येतील. मोकाट व अपघातग्रस्त चानांना सुरक्षित ठेवण्यासाठी वा प्राणी केंद्राची निर्मिती केली जात आहे. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी या दोन्ही ठिकाणी भेटी देऊन कामाची पाहणी केली. हे केंद्र उभारणारी अमरावती महानगरपालिका ही महाराष्ट्रातील पहिली ठरणार आहे.या केंद्राच्या उभारणीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीचा वापर करून राहाटगाव व कोंडेकर कोबे प्राणी निवारा केंद्राची कामे जोरात सुरू असून येत्या ३ ते ४ महिन्यांत ही केंद्रे पूर्णत्वास येतील. राहाटगाव येथील प्राणी निवारा केंद्रात सुमारे १०० मोकाट व अपघातग्रस्त श्वानांना ठेवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, या केंद्रात जखमी, हिंसक व आजारी श्वानांवर उपचार केले जातील. श्वानांच्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी उत्पत्ती नियंत्रण उपक्रमही या केंद्रात राबविला जाणार आहे. हा उपक्रम शहरातील नागरिकांसाठी सुरक्षितता व स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.राहाटगाव प्राणी निवारा केंद्राच्या पाहणीदरम्यान महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी संबंधित विभागांना निर्देश दिले की,कामाच्या गतीला वेग द्यावा. प्राणी निवारा केंद्राचे बांधकाम येत्या ३ ते ४ महिन्यांत पूर्ण व्हावे यासाठी ठेकेदार व संबंधित अभियंत्यांनी वेळापत्रकानुसार काम पूर्ण करावे. प्रत्येक सुविधा गुणवत्तापूर्ण असावी. या पाहणी दौऱ्यात शहर अभियंता रवींद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, पशुशल्य चिकीत्सक डॉ. सचिन बोंद्रे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भुषण पुसतकर, उपअभियंता आशिष अवसरे, अभियंता राजेश आगरकर, आनंद जोशी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.



# बच्चू कडू यांच्या प्रहारला अकोल्यात खिंडार ...

## प्रहारचे पदाधिकारी राकाँमध्ये; अरविंद पाटील यांना मोठे पद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अकोला –** जिल्ह्यात प्रहार जनशक्ती पक्षाला धक्का बसला असून, पक्षाचे उपजिल्हाप्रमुख अरविंद पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. प्रवेश होताच त्यांची नियुक्ती पक्षाच्या किसान सभेच्या जिल्हाध्यपदी करण्यात आली.आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांकडून इनकमिंगवर भर देण्यात येत आहे. जून महिन्यात राकाँच्या अजित पवार गटाने मोठा मेळावा घेत पक्ष प्रवेश सोहळा आयोजित केला होता. आता ग्रामीण राकाँने ग्रामीण भागात संघटन विस्तारावर भर दिला आहे.

दरम्यान बुधवारी प्रहारच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आ. अमोल मिटकरी, किसान सभेचे राज्यप्रमुख ड. वसंतराव मनकर, जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा उपस्थित होते. त्यांची नियुक्ती राकाँचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शन करण्यात आली आहे. सध्या जिल्ह्यात पीक कर्जमाफीसाठी राजकीय पक्ष, सामाजिक संघटनांकडून आंदोलन करण्यात येत आहे. २४ जुलै रोजी तर प्रहारतर्फे जिल्ह्यात ६ पेक्षा जास्त ठिकाणी चक्का जाम आंदोलन करण्यात आले होते. यात आज राकाँमध्ये पक्ष प्रवेश करणाऱ्यांचाही समावेश होता. आता अर्थ व कृषी खाते राकाँकडेच आहे. त्यामुळे कर्जमाफीसाठी आता राकाँची किसान सभा प्रयत्न करणार का?, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. तसेच सन २०१४ ते आतापर्यंत महाविकास व महायुतीच्या काळात तीन कर्जमाफि योजना जाहीर होत्या. मात्र अटी, निकष, दस्तावेजांमुळे एकूण ८१ हजार ३३५ शेतकरी लाभापासून वंचित राहिले होते. त्यामुळे आता कर्जमुक्ती जाहीर करताना विना अट, निकषांशिवाय करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.प्रहारला जि.प.मध्ये खिंडार उद्धव ठाकरे सरकारच्या काळात अकोल्याचे पालकमंत्री पद प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्याकडे होते. त्या काळात पक्ष प्रवेश करणाऱ्यांची संख्या प्रचंड होती. २०२०च्या जि.प. निवडणुकीत स्फूर्ती निखिल गावंडे या विजयी झाल्या. त्यानंतर महिला व बाल कल्याण समिती सभापती पदही देण्यात आले. मात्र नंतर गावंडे यांनी वंचितमध्ये प्रवेश केला. त्यानंतर तर पक्षाला सोडचिठ्ठी देणाऱ्यांची संख्या वाढत आहे.




# वनरक्षक भरतीत 'डमी' ने दिली मैदानी चाचणी

## सात वर्षांनंतर युवकाविरुध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती –** सात वर्षांपूर्वी झालेल्या वनरक्षक भरतीमध्ये लेखी परीक्षा व मैदानी चाचणीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट होताच वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा निरंजन हरणे (वय ४४) यांनी नांदगाव पेठ ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

प्रदीप बदामसिंग सुलाने (वय २७, रा. नळणी वाडी, ता. भोकरदन जि. जालना) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे. सन २०१९ मध्ये पिंपरी चिंचवड येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये काही उमेदवारांनी लेखी व मैदानी परीक्षेदरम्यान गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आले होते. तेव्हा ४ जानेवारी २०२२ रोजी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. यामध्ये प्रदीप सुलाने हा सुध्दा आरोपी होता. तसेच सन २०१८ रोजी आरोपीने अमरावतीमध्ये झालेल्या वनरक्षक पदाची भरतीसुध्दा दिली. तेव्हा भरती दरम्यान त्याने लेखी चाचणीमध्ये स्पाय ब्लू टूथ डिवाईसचा वापर केला आणि मैदानी चाचणीच्या वेळी स्वतःच्या जागेवर चुलत भाऊपझसिंग पुनमसिंग बमनावत याला डमी उमेदवार म्हणून पाठवून मैदानी चाचणी दिली आणि उत्तीर्ण झाला. परंतु मुख्य वनसंरक्षक कार्यालय अंतर्गत नेमलेल्या समितीच्या चौकशीमध्ये कसून पाहणी करण्यात आली. तसेच मैदानी चाचणी दरम्यानचे व्हिडिओ फुटेज तपासण्यात आले. तेव्हा आरोपीच्या जागी दुसरा इसम घाव चाचणीत दिसून आला. त्यामुळे आरोपीने वनरक्षक भरती प्रकियामध्ये गैरमार्गाचा अवलंब करून वनरक्षक पदावर गैरकायदेशीरमार्गाने नियुक्ती मिळविली असल्याचे निष्पन्न होताच वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांनी २९ जुलै २०२५ रोजी नांदगाव पेठ ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



# गतिरोधकांवर पांढऱ्या पट्ट्यांचा अभाव अपघातांना निमंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ मोर्शी** पांढुर्णा–नागपूर–अमरावती या प्रमुख मार्गावरील मोर्शी शहरातून जाणार्या मुख्य रस्त्यावर असलेल्या गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्यामुळे वाहनचालकांना हे गतिरोधक वेळेवर दिसत नाहीत. परिणामी अनेक किरकोळ अपघात घडत असून वाहनांचीही नाहक हानी होत आहे. शहरातील मुख्य रस्त्यावरून दररोज मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थ्यांपासून ते कार्यालयीन कर्मचार्यांपर्यंत नागरिकांची वर्दळ असते. या रस्त्यावर आधीचे गतिरोधक तुटलेले असून काही ठिकाणी खिळे बाहेर आले आहेत. त्यामुळे वाहनांचे टायर पंचर होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच काही गतिरोधक इतके झिजले आहेत की ते दिसेनासे झाले असून वाहनचालक त्याकडे दुर्लक्ष करून गती न कमी करता थेट पुढे निघतात. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांकडून या समस्या वारंवार उपस्थित केल्या जात होत्या. त्यानुसार महापालिका प्रशासनाने शहरातील रस्त्यांवर नवीन गतिरोधक बसवले, मात्र त्यावर पांढरे पट्टे न मारल्याने वाहनचालकांना ते रात्री अथवा ओल्या हवामानात लक्षात येत नाहीत. परिणामी दुचाकी घसरून पडणे, गाड्यांचे नुकसान आणि वाहतूककोंडी यासारख्या समस्या उद्भवत आहेत.शहरातील प्रमुख शाळा व महाविद्यालये या मार्गालगतच असल्याने शालेय वेळेत विद्यार्थ्यांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अपुरे दृश्य संकेत आणि पावसाळ्यामुळे ओले रस्ते – या सगळ्यांचा मिळून अपघाताच्या घटनांवर परिणाम होत आहे. अनेक वेळा वाहनचालकांना ब्रेक द्यायलाही उशीर होतो.नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही समस्या तातडीने सोडविणे आवश्यक आहे. स्थानिक प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत नव्याने बसवलेले तसेच अस्तित्वात असलेले सर्व गतिरोधक रंगवावेत, अशी नागरिकांकडून मागणी केली जात आहे.



# अमरावतीच्या योगवर्गाची राज्यस्तरीय सुवर्णसाधना!

## २५ पदकांची भरघोस कमाईप्रशिक्षिका मेघा ठाकरे यांच्या चमूची अभिमास्पद कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१नांदगाव पेठ–** अमरावती जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने २७ जुलै रोजी पार पडलेल्या बृहन महाराष्ट्र योग स्पर्धेत नांदगाव पेठ येथील आयुष आरोग्यवर्धिनी उपकेंद्र व पोटेटाऊनशिप योगवर्गाने आपली अभूतपूर्व कामगिरी सादर करत राज्यपातळीवर अमरावतीचे नाव गौरवाने उजळवले आहे. या स्पर्धेत संघाने तब्बल २५ पदकांची कमाई करत सगळ्यांचे लक्ष वेधले. यात १० सुवर्ण, १० रजत आणि ५ कास्य पदकांचा समावेश असून ही कामगिरी संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. या संघात सहभागी असलेल्या योगसाधकांनी आपली सर्वोत्तम कामगिरी सादर करत पदकांवर आपली मोहोर उमटवली. या विजेत्या स्पर्धकांमध्ये सीमा घोडेस्वार, अंजली इंदोरे, सुनिता चौके, नंदा आमले, मनीषा कापडे, ज्योती बावणे, नंदा राऊत, रजनी गहेरवार, मीनल काकड, श्रीकांत काकड, शितल धनभर, सीमा मोहोड, अनिता देशमुख, योगिता नानवटकर, नीलिमा वाठोडे, समृद्धी लहाने आणि नेहा वांगे यांचा समावेश होता. या सर्वांनी विविध गटांमध्ये उत्कृष्ट सादरीकरण करत सुवर्ण, रजत व कास्य पदके पटकावली. स्पर्धेत संजीवनी अकोलकर, सविता इंदोरे आणि शितल जामकर यांनीही सहभाग घेऊन आपले कौशल्य सादर केले. त्यांच्या सादरीकरणालाही प्रेक्षक आणि परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली.या संपूर्ण संघाचे मार्गदर्शन प्रशिक्षिका मेघा ठाकरे यांनी केलं. विशेष म्हणजे त्यांनी स्वतःही स्पर्धेत सहभाग घेऊन दोन सुवर्णपदकांची कमाई करत आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवला. संपूर्ण संघाने आपल्या यशाचे श्रेय मेघा ठाकरे यांच्या प्रेरणादायी आणि सखोल मार्गदर्शनाला दिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये डॉ. वशिष्ठ खोडसकर, प्राचार्य संदीप मंडले, डॉ. चंदन सिंग राजपूत व इतर सहकारी यांचे मोलाचे योगदान लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे स्पर्धा अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वी ठरली.योग म्हणजे केवळ शरीराच्या लवचिकतेचा नव्हे, तर मनोबल, संयम आणि निस्वार्थ साधनेचा अविष्कार आहे आणि तो अमरावतीच्या या विजयी संघाने सार्या महाराष्ट्रासमोर उभा केला अशी प्रतिक्रिया यावेळी योग प्रशिक्षक मेघा ठाकरे यांनी दिली.




# तिवसा, मोझरीत एसटी बस थांबवण्याची मागणी

## आ. वानखडे यांच्या नेतृत्वात भाजपाचे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१तिवसा**

तालुक्यातील गुरुकुंज मोझरी व तिवसा या ठिकाणी एसटी महामंडळाच्या अनेक बसेस थांबत नाही. तसेच पंचवटी चौक येथेही बसेस थांबत नसल्याने प्रवास्यांना त्रास सहन करावा लागत आहे. आमदार राजेश वानखडे यांच्या नेतृत्वाखाली भाजप पदाधिकाऱ्यांनी एसटी महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक यांना निवेदन देत सकारात्मक चर्चा केली. हा प्रश्न तत्काळ मार्गी लागणार असल्याचे बोलल्या जात आहे. तिवसा तालुक्यातील भाजप शिष्टमंडळातर्फे प्रादेशिक व्यवस्थापक नियंत्रकांना तिवसा पंचवटी चौकात बस थांब्याबद्दल निवेदन देण्यात आले. तिवसा तालुक्यातील विद्यार्थी, रूण, शासकीय कर्मचारी, व्यापारी ई. दररोज एसटी बसने प्रवास करतात. तालुक्यातील सर्व प्रवासी जनतेचे भेडसावणारे प्रश्न मार्गी लावण्याच्या अनुषंगाणे एसटी महामंडळ चे मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक नियंत्रक अमरावती प्रदेश यांची भेट घेऊन सर्व प्रवासी जनतेचे दररोजचे प्रश्न त्यांच्या समोर मांडण्यात आले. यावेळी आमदार राजेश वानखडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. या वेळी सर्व मुद्दे लवकरच निकाली काढण्याची सकारात्मानक भूमिका एसटी प्रशासन कडून घेण्यात आली आहे. तिवसा पंचवटी चौक येथील थांबाला (पंचवटी तिवसा किंवा चांदूर फाटा) अशी स्वतंत्र तिकीट सर्व वाहक यांच्या मशिन मध्ये निघेल, याची कार्यवाही सुरू आहे. अशी ग्वाही एसटी महामंडळ करून देण्यात आली आहे. यावेळी तिवसा शहर अध्यक्ष अजय गुल्हाने, शहर सरचिटणीस अंकुश देशमुख, सुमित अनासाने, रोशन राठी, सूरज तवर, वैभव भोंबे, भूषण मुंदाने, अजय केने आदी कट्टर कार्यकर्ते उपस्थित होते.



# इंटरसिटी सुपरफ़ास्ट एक्सप्रेस आरक्षित चार डबे

## अमरावती–अजनी–अमरावती एक्सप्रेसमध्ये प्रवाशांना आता अधिक सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ नागपूर : –** राज्याची उपराजधानी आणि विदर्भातील प्रमुख शहर अमरावतीच्या प्रवाशांसाठी आनंदाची वार्ता रेल्वेने दिली आहे. या मार्गावर नोकरी, व्यावसायिक कामांसाठी दररोज मोठ्या प्रमाणात अप–डाऊन करणारे लोक आहेत. त्यांच्यासाठी आता शयनयान, वातानुकूलित डब्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. नागपूर ते अमरावती दरम्यान १७४ किलोमीटरचे अंतर आहे. या एवढ्या कमी अंतरावर शयनयान, एसी थ्री टिअरच्या डब्यांना प्रवासी मिळत नसल्याने या इंटरसिटी एक्सप्रेसला दोन स्लीपर, एक एसी तीन टियर इकॉनॉमी आणि एक एसी चेयर कार असून कुलूप बंद करण्यात आले होते. ही डबे निव्वळ नागपूर ते अमरावती रिकामे धावत होते. राज्याची उपराजधानी नागपूर आणि अमरावतीला जोडणारी अजनी–अमरावती इंटरसिटी सुपरफास्ट एक्सप्रेसचे हे डबे आता प्रवाशांसाठी खुले केले जाणार आहेत.मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात चालवल्या जाणार्या गाडी क्रमांक १२११९/१२१२० अमरावती–अजनी–अमरावती एक्सप्रेसमध्ये प्रवाशांना आता अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर गाडी १६ एलएचबी डब्यांसह चालवली जात आहे, ज्यामध्ये दोन गार्ड–कम–लगेज व्हॅन, दोन स्लीपर कोच, एक द्वितीय वातानुकूलित डबा, एक वातानुकूलित चेयर कार व एक नॉन–एसी चेयर कारचा समावेश आहे. यापैकी चार राखीव डबे (दोन स्लीपर, एक एसी तीन टियर इकॉनॉमी आणि एक एसी चेयर कार) सध्या रिकाम्या आणि लॉक अवस्थेत धावत होते.

रेल्वे प्रशासनाने या चार डब्यांना १ऑगस्ट २०२५ पासून तीन महिन्यांच्या प्रयोगात्मक कालावधीसाठी सर्वसामान्य प्रवाशांच्या आरक्षणासाठी खुलं करण्याचा निर्णय घेतला आहे.



# शेंदूरजनाघाट येथील दोघींचा सर्पदंशाने मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३१वरूड**

सर्पदंशाने दोन महिलांचा मृत्यू झाल्याची घटना शेंदूरजनाघाट येथे बुधवारी (दि.३०) घडली. तर वरूड शहरातील राजुरा नाका परिसरातील एका युवकाला सर्पदंश झाल्याने त्याला अमरावतीला हलविण्यात आले.

शेंदूरजना घाट येथील मंदा पुरुषोत्तम अकर्ते (वय ५०) व दिपाली बंडु उर्फ यशवंत होले (वय २६), अशीमृत महिलांची नावे आहेत. तर सर्पदंश झालेल्या राजुरा नाका परिसरातीलअंकुश संतोष उईके याला उपचारार्थ अमरावतीला दाखल करण्यात आले आहे. शेंदूरजनाघाट येथील बालापेठ परिसरातील धनगवळी मंदिर परिसरात वास्तव्य असलेल्या मंदा पुरुषोत्तम अकर्ते यांना पहाटे झोपेतच सर्पदंश झाला. तिला अस्वस्थ वाटू लागल्याने खासगी रुग्णालयात व नंतर वरूडग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. मात्र परिस्थिती चिंताजनक असल्याने तिला अमरावतीला हलविण्यात आले. परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तसेच शेंदूरजनाघाट येथील न.प. मराठी शाळा परिसरातील दीपाली बंडू उर्फ यशवंत होले (२६) हिला सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास राहत्या घरीच सर्पदंश झाला. तिला तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. वरुडच्या राजुरा नाका परिसरातील अंकुश संतोष उईके याला दुपारी १.३० वाजताच्या सुमारास सर्पदंश झाला. तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्याची परिस्थिती चिंताजनक असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्याने त्याला तत्काळ अमरावतीला हलविण्यात आले.


# उघड्या डोळ्यांनी 'स्पेस स्टेशन' पाहण्याची सुवर्णसंधी

## ३१ जुलै, १ व ३ ऑगस्ट रोजी अमरावतीकरांसाठी दुर्मिळ अनुभव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती**

ग्रह–ताऱ्यांच्या निरीक्षणात रुची असलेल्या अमरावतीकरासाठी आनंदाची बातमी आहे. ढगाळ हवामान काहीसे निवळल्यामुळे येत्या ३१ जुलै, १ आणि ३ ऑगस्ट रोजी मानव निर्मित 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' (खडड) उघड्या डोळ्यांनी पाहण्याची दुर्मीळ संधी उपलब्ध होणार आहे. या अद्वितीय खगोलीय दृश्याचा अनुभव घेण्याचे आवाहन खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी केले आहे.४३० टनांचे भव्य स्पेस स्टेशन पृथ्वीपासून सुमारे ४०० किलोमीटर उंचीवर अत्यंत वेगाने – दर तासाला तब्बल २८,००० किलोमीटर – फिरणारे हे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन हे पृथ्वीच्या प्रदक्षिणा करणारे एक महत्त्वपूर्ण मानवनिर्मित संशोधन केंद्र आहे. यावर अलीकडेच इस्रोचे पहिले अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी शून्य गुरुत्वाकर्षणात विविध प्रयोग यशस्वीरीत्या पार पाडले आहेत.



### स्पेस स्टेशन कधी, कुठे दिसणार?

हे स्टेशन दररोज पृथ्वीभोवती सुमारे १५ प्रदक्षिणा पूर्ण करत असते. जेव्हा हे आपल्या देशाच्या व विशेषतः विदर्भाच्या आकाशातून जात असते, तेव्हा ते फिरत्या तेजस्वी चांदणीसारखे काही मिनिटांसाठी नुसत्या डोळ्यांनी स्पष्टपणे दिसते. पुढील वेळापत्रकानुसार अमरावतीकरांना ते खालील वेळांना दिसण्याची संधी आहे:

३१ जुलै (गुरुवार): रात्री ८:५१ ते ८:५४ या वेळेत वायव्य आकाशातून मध्य आकाशाकडे

१ ऑगस्ट (शुक्रवार): रात्री ८:०२ ते ८:०७ उत्तर आकाशातून पूर्व आकाशाकडे


३ ऑगस्ट (रविवार): रात्री ८:०२ ते ८:०८ पश्चिम आकाशातून दक्षिणेकडे–

# दर्यापुरात जुगाड़ अड्यावर पोलिसांची धाड़

## ६ जुगाऱ्यांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१दर्यापूर –** शहरातील शिवर नाका ते हॉटेलमध्ये लाईटच्या उजेडात दर्यापूर शिवर रोडवरील रस्त्यालगत एका हॉटेल मध्ये १० ते १५ जण जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती दर्यापूर पोलिसांना मिळाली. दरम्यान ठाणेदार सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी सापळा रचून सायंकाळी ७.३० वाजताच्या सुमारास धाड टाकली. यावेळी काही लोक पळून गेलेत. तर एकूण६ जुगाऱ्यांना ताब्यात घेत घटनास्थळावरून रोख रक्कम, जुगार साहित्य व इतर असा एकूण १ लाख २० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीसांच्या या कारवाईत एका राजकीय व्यक्तीचा सहभाग असल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. कारवाई दरम्यान जुगारखेळताना एफआयआर नोंदीनुसार रा. जुनी तहसिलजवळ दर्यापूर, शेख वसिम शेख हसनु (वय ३२) रा. जसपूरा प्लॉट. खोलापूर, विनोद सुरेश चौधरी (वय ३९) मोहम्मद इर्शाद अब्दुल रशिद (वय ४३) रा. जसपूरा प्लॉट खोलापूर, भुजंग रमेश गूळदे (वय ३८) रा. बाभळी. ऋषिकेश संजय जळमकर (वय ३५) रा. गांधी नगर दर्यापूर व सागर उर्फ सोनू अरुण गावंडे (वय ४६) रा. राठीपुरा, बनोसा यांना पोलीसांनी रंगेहाथ पकडून ताब्यात घेत गुन्हा दाखल केला. समजपत्रावर त्यांची सुटका केली. ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, एसडीपीओ राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सुनील वानखडे, रोहीत सोनटक्के, निवृत्ती बरगट, सचिन जाधव, चालक अनिल आडे यांनी ही कारवाई केली.



# स्मार्ट मीटर काढा, अन्यथा आम्हीच काढू

## शिंदी ग्रामस्थांचा संताप : निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला ताठर इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१शिंदी बु.**

महावितरण कंपनीने ग्राहकांना न विचारता स्मार्ट मीटर लावले आहे. याला संपूर्ण महाराष्ट्रात विरोध सुरु आहे, तर ज्या ग्राहकांच्या घरी हे स्मार्ट मीटर बसविले, त्यांना एका महिन्याचे चार ते पाच हजार रुपये वीजबिल आल्यामुळे ग्राहक संतप्त झाले आहे. यामुळे ग्राहकांना न विचारता लावलेले स्मार्ट मीटर त्वरित काढावे. अन्यथा आम्ही काढू, असा इशारा कनिष्ठ अभियंता प्रयास मांडवे यांना शिंदी पोही येथील ग्राहकांनी निवेदनद्वारे दिला आहे.कर्नाटक उच्च न्यायालयाने ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविता येणार नाही, असा आदेश २५ एप्रिल २०२५ रोजी दिला आहे, तसेचमहाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही विधानभवनात ग्राहकांच्या परवानगीशिवाय मीटर बसविता येणार नाही, अशी माहिती दिली आहे, मग ही महावितरणची जबरदस्ती मुजोरी कशाला, ज्या ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटर बसविले आहे, त्या ग्राहकांना चार ते पाच हजार रुपये एका महिन्याचे वीजबिल आले आहे. यामुळे या स्मार्ट मीटरविषयी ग्राहकांत मोठा रोष व्यक्त होत आहे. अशात जर तीन दिवसांत स्मार्ट मीटर महावितरणने काढले नाही, तर आम्ही हे मीटर काढून टाकू आणि होणाऱ्या नुकसानीस महावितरण कंपनी जबाबदार राहील, अशा इशारा शिंदी वीज कंपनी कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता प्रयास मांडवे यांना निवेदनाद्वारे ग्राहकांनी दिला आहे.निवेदन देतेवेळी माजी सभापती पं. स. देवेंद्र पेटकर, अनिल सांगोळे, सरपंचा रजनी गजभिये, संघेश गावंडे, निखिलनाथे, नरेंद्र भगत, विकास तायडे, रोशन जळमकर, प्रकाश गजभिये, विनोद गाडगे, प्रवीण चांदुरकर, बबन घुटे, संजय वाठसह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संच मान्यतेसाठी ३० सप्टेंबरची पटसंख्या ग्राह्य धरली जाणार

## संचमान्यतेचा संभ्रम अखेर मिटला


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

राज्यातील सर्व शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती यु-डायस प्लस प्रणाली, सरल प्रणाली, मध्ये दिनांक ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत अद्यावत करून अंतिम करण्यात यावी, असे आदेश संजय जाधव, प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी दिले आहेत. यामुळे संच मान्यता अखेर ३० सप्टेंबरच्या आधारे निश्चित झाल्याने मोठा संभ्रम अखेर दूर झाला आहे.

राज्यातील काही जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांनी पत्र काढून ३१ जुलै २०१५ पर्यंत माहिती अद्यावत करण्यासंदर्भात आदेशित केले होते.त्यामुळे राज्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी प्राथमिक, माध्यमिक उच्च माध्यमिक, शाळांमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता. त्यासाठी प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने शिक्षण मंत्री दादा भुसे यांना भेटून यासंदर्भात सर्व माहिती देऊन निवेदन देण्यात आले होते. शिक्षण मंत्र्यांनी त्वरित याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित केले. तसेच सर्व माहिती अद्यावत करून अंतिम करणे बाबत केंद्र शासनाकडून ३० सप्टेंबर २०२५ अंतिम मुदत देण्यात आलेली आहेत. याबाबत प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी सांगितले की, संच मान्यता २०२५-२०२६ चे शिक्षक व एकूणच शिक्षण क्षेत्रातील मोठा संभ्रम निर्धारण ३० सप्टेंबर २०२५ राहणार असल्याने यामुळे दूर झाला आहे शिक्षणमंत्री यांनी शब्द महेश ठाकरे यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या पाळल्याने प्रहार शिक्ष संघटनेचे राज्याध्यक्ष आभार मानले आहेत. यावेळी निवेदनातून इतर मागण्या पण करण्यात आलेल्या आहेत.

# अबब! मजुराला घरगुती विजेचे तब्बल १ लाख रुपयांचे बिल

## वीज वितरण कंपनीच्या भोंगळ कारभाराचा बळी ठरला गरीब कुटुंब





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अचलपूर**

शासकीय योजनेंतर्गत मिळालेल्या घरकुलात राहत असलेल्या राजू उत्तम काळह या मजुराच्या घरात केवळ दोन बल्ब आणि एक पंखा असूनही जून २०२५ मध्ये त्यांना तब्बल ४,७२९ युनिट वापराचे आणि १,००,९८० रुपये इतके वीज बिल देण्यात आले आहे. हा आकडा पाहून राजू आणि त्यांचे संपूर्ण कुटुंब हादरून गेले आहे.

घरात वीज उपकरणं नाहीत, तरी लाखाचं बिल कुठून आलं? एवढ्या पैशांचं मीटर कसं दाखवतं? हे कंपनीचे घोडचूक की ग्राहकांची लूट? असा सवाल करत राजू काकड यांनी कंपनीच्या कार्यप्रणालीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.राजू काकड यांचे म्हणणे आहे, घर मी मोलमजुरी करून बांधलं. रोजंदारीवर काम करून घर चालवतो. घरात जेमतेम दोन बल्ब आणि एक पंखा आहे. तरीही एक लाख रुपयांचं बिल आले. हे सरळसरळ लुटच आहे.त्यांनी कंपनीकडे विनंती केली की, माझे बिल योग्य तपासून ४००-५०० रुपयांपर्यंत दुरुस्त करून द्यावे.

कंपनीकडून दुर्लक्ष:ग्राहकांच्या आरोपानुसार, वीज मीटरमध्ये दोष असतानाही कंपनीकडून त्या दोषाकडे दुर्लक्ष केले जाते. मीटरचे छायाचित्र घेतले जाते, मात्र बिलामध्ये चुका असूनही ग्राहकालाच कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात.अधिकाऱ्यांकडे दाद मागितली, तरी उत्तर मिळते, सध्या जे बिल आहे ते भरावे, पुढच्या बिलामध्ये समायोजन करू. मात्र पुढील महिन्यांमध्येही दुरुस्ती केली जात नाही, असा अनुभव अनेक ग्राहक सांगत आहेत.

# महिलांचा पुढाकार, डेंगू जनजागृती व स्वच्छता अभियानामध्ये सहभाग

## महिलांनी हाती झाडू घेत स्वत:च केली स्वच्छता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

शहराची स्वच्छता ही केवळ महानगर पालिकेचीच जबाबदारी नसून यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे वारंवार अधोरेखित केले जात आहे. त्याच अनुषंगाने पवननगर येथील महिलांनी डेंग्यू जनजागृती व स्वच्छता अभियानांतर्गत महानगर पालिकेला सहकार्य करण्याच्या भावनेने स्वतःच हाती झाडू घेऊन स्वच्छता केली. शहरी आरोग्य केंद्र, महेंद्र कॉलनी, अमरावती अंतर्गत अहिल्या महिला आरोग्य समितीच्या वतीने पवन नगर येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. याउपक्रमाअंतर्गत डेंगू तसेच इतर साथीच्या रोगांबाबत जनजागृती करण्यात आली.

आरोग्य सेवक मनीष हटवार व उमेश जाधव यांनी महिलांना डेंगूविषयी महत्त्वाची माहिती दिली. डासांची पैदास टाळण्यासाठी घ्यावयाच्या स्वच्छता उपाययोजना, पाण्याचे साठे टाळणे आणि घराभोवती साफसफाई कशी ठेवावी याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात अहिल्या महिला आरोग्य समितीच्या सचिव आशा वर्कर संध्या पाटील, अध्यक्ष परविना आठवले, आरोग्य सेविका वैशाली सुरवसे व कल्पना वानखडे, तसेच महिला कार्यकर्त्या सिंधू ढवळे, उज्वला मात्रे, अक्षरा कीर्तनकार, कांता मरकाम, मोहोळ इत्यादी महिलांचा सक्रिय सहभाग होता.या उपक्रमामुळे पवन नगर परिसरातील नागरिकांमध्ये स्वच्छता व आरोग्य विषयक जागरूकता निर्माण झाली असून, महिलांचा सहभाग विशेषतः उल्लेखनीय ठरला. महिलाच नव्हे तर पुरुषांनीही मनावर घेतले तर शहराच्या स्वच्छतेत भर पडल्याशिवाय राहणार नाही. यासाठी प्रत्येकाने कचरा न करणे, स्वच्छता ठेवणे या नियमांचे जर पालन केले तर कचरा शहरात इकडून तिकडे उडताना दिसणार नाही, असेही या महिला म्हणाल्या.

# आता गावखेड्यातही ऑनलाईन जुगाराचं फॅड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१पथ्रोट**

पूर्वी काकड आरती, भजन, कीर्तनाचे बोल ग्रामीण महाराष्ट्रात गावागावात कानी पडायचे: मात्र अलीकडच्या काळात मोबाईलच्या अतिरेकी वापराने गावचे हे गावपण हिरावलं गेलं.

ऑनलाईन जुगारात ग्रामीण महाराष्ट्र पोखरला जात असून शाळा-महाविद्यालयातील तरुण, मजूर, शेतकरी अनेकांच्या डोक्यात या जुगाराची कीड गेल्याचं पाहायला मिळत आहे. मोबाईलमधून तरुणाईला विळख्यात ओढणारा जुगार थांबवणे पोलिसांनाही अवघड बनत आहे. या जुगाराच्या आहारी गेलेले तरुण आपले जीवन संपवत आहे. त्यामुळे, या जुगाराच्या गेम्सची जाहिरात करणाऱ्या सेलिब्रिटींच्या भूमिकेवरही प्रश्न उभे राहतात.आधी च्या काळात काकड आरती, भजन, कीर्तनाचे बोल ग्रामीण महाराष्ट्रात गावागावात कानी पडायचे; मात्र आलीकडच्या मोबाईलच्या अतिरेकी वापराने गावचे हे गावपण हिरावलं गेलं. माणूस माणसापासून दूर गेला, अबोल झाला. स्वतःमध्येच गुरफटणाऱ्या या माणसांच्या डोक्यात मोबाईलमधून आता ऑनलाईन जुगाराची कीड शिरली. शाळा, कॉलेजमधील तरुणाईसोबतच दररोज रोजंदारीवर जाणारे मजूर, शेतकरीदेखील या जुगाराच्या विळख्यात ओढले गेले आहेत. त्यामुळे या जुगाराच्या गेम्सची जाहिरात करणाऱ्या सेलिब्रिटींच्या भूमिकेवरही प्रश्न उभे राहतात. ऑनलाईन जुगाराची जाहिरात खेळाडू, सेलिब्रिटी करतात. त्यामुळे त्याचा तरुणाईवर मोठा पगडा आहे.

# नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याकरिता समाधान शिबीर : आ. उमेश यावलकर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मोर्शी**

गेल्या अनेक दिवसांपासून श्रावण बाळ, संजय गांधी योजनेच्या काही लाभार्थ्यांना डीबीटी व इतर कारणांमुळे मिळत नसलेले मानधन, अनेक शेतकर्यांना विविध तांत्रिक अडचणींमुळे इतर त्यांचे खात्यात जमा होवु न शकलेली मदत, आधारकार्ड अपडेटसह समस्यांचा नागरिकांना सामना करावा लागत असून सातत्याने तहसिल कार्यालयाच्या येरझारा कराव्या लागत असल्यामुळे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी पुढाकार घेत तहसिलदार व नायब तहसिल यांचेशी चर्चा करुन तालुक्यातील प्रत्येक सर्कलमध्ये समाधान शिबीर घेवून त्याच ठिकाणी नागरिकांच्या आणि लाभार्थ्यांना समस्या सोडविण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता नागरिकांना त्यांच्याच मुख्य गावामध्ये ऑनलाईन सुविधेसह सर्व प्रकारचे प्रमाणपत्रसुध्दा मिळणार असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त केल्या जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून शासनाच्या विविध योजनांमधील अनुदान, मदत, वेतन नागरिकांना मिळण्यास विलंब होत असतांना अनेक शेतकरी ऑनलाईन केंद्र किंवा तहसिल कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत होत्या. अनेकांना आपली मजुरीवर पाणी फेरुन जास्तीचा खर्च करून यावे लागत होते. काही शेतकर्यांनी नुकतीच आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांची भेट घेवुन यावर तोडगा काढण्याची मागणी केली होती. आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी तहसिलदार रामदास शेळके व नायब तहसिलदार यांना निवासस्थानी बोलावून घेतले आणि काही लाभार्थी व शेतकर्यांसोबत चर्चा करून त्याच्यावर तोडगा काढण्याचे निर्देश दिले.

# चांदूरबाजार-वलगाव मार्गावरील वाळलेली झाडे अपघातास आमंत्रण - तातडीने कारवाईची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१चांदुर बाजार**

चांदूरबाजार ते वलगाव या मुख्य मार्गावर वाहनधारकांसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणावर निंबाची झाडे असून त्यातील अनेक झाडे पूर्णतः वाळलेली, जीर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे ही झाडे कोणत्याही क्षणी रस्त्यावर कोसळून मोठा अपघात घडवू शकतात, असा नागरिकांचा इशारा आहे.

या मार्गावर चांदूरबाजारपासून वलगावकडे जाणाऱ्या सुमारे ६ किलोमीटर अंतराच्या पट्ट्यात तब्बल १६ झाडे सुकलेली आणि जीर्णावस्थेत असून, काही झाडांच्या फांद्या रस्त्याच्या मध्यावर लोंबकळत आहेत, त्यामुळे वाहनचालकांना सतत धास्तीने वाहतूक करावी लागत आहे.

या मार्गावरून शालेय बस, एसटी वाहतूक तसेच ट्रॅक्टर, दुचाकी, खासगी वाहनांची दैनंदिन मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. अशा स्थितीत जर ही झाडे अचानक उन्मळून पडली, तर प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक ग्रामस्थ, वाहनचालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. अनेक नागरिकांनी असेही स्पष्ट केले की, गेल्या काही महिन्यांपासून ही झाडे अशीच उभी असून, त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

**वनविभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आले**

या संपूर्ण प्रकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम कार्यालय, चांदूरबाजारचे उपअभियंता मिलिंद भेंडे यांनी माहिती देताना सांगितले की चांदूरबाजार ते वलगाव मार्गावरील वाळलेली झाडे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या फांद्या काढण्यासाठी वनविभागाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. मंजुरी मिळताच तातडीने कारवाई केली जाईल.

# दर्यापूर येथून पायदळ पालखीचे शिर्डीकडे प्रस्थान

## भक्तिरसात न्हालेल्या दर्यापूरकरांनी दिला साईपालखीला उत्स्फूर्त निरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१दर्यापूर**

ओम श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ सेवा संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दर्यापूर ते शिर्डी पायदळ पालखी वारीने भक्तिभावात मार्गक्रमण करत नुकतेच शिर्डीला प्रस्थान केले. ही पालखी १७ दिवसांचा पायदळ प्रवास करत साईबाबांच्या चरणी शिर्डीत पोहचणार आहे.

या वारीत दर्यापूर शहरातील २१ साईभक्त सहभागी झाले असून, प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर नव्या भक्तांची भर पडणार आहे. वारीच्या प्रारंभी साईनाथ मंदिरात महाआरती आणि पादुकांचे विधीपूर्वक पूजन करण्यात आले. यानंतर फटाक्यांच्या जल्लोषात आणि भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात पालखीने मार्गक्रमण सुरू केले.

या वेळी पावसाच्या सरींचा विचार न करता मोठ्या संख्येने दर्यापूरकर साईभक्त सहभागी झाले होते. पालखी मंदिराच्या बाहेर बबन सेठ खंडेलवाल यांनी विशेष पूजन केले. यानंतर सुधाकर पाटील भारसाकळे, आमदार गजानन लवटे, मोहनसेठ झुणझुणवाला, संजय शुक्ला, मनोहर लोधे, एस. के. देशमुख, जाहीद हुसैन, बाळासाहेब टोळे, दिनकर गायगोले, सुनील कुंडलवाल, प्रवीण कोठारी, ईश्वर बुंदेले, सतीश भारसाकळे, प्रकाश कुटाफळे आदींनी पालखीचे स्वागत करत पुष्पवृष्टी केली.

मार्गक्रमण करत असताना दिंडीतील टाळ-मृदंगाच्या गजरात, ओम साई आणि जय जय साई च्या भक्तिगीतांत आणि अभंगगायनात सहभागी भाविक उत्साहात चालत होते. गावाच्या शिवेपर्यंत दर्यापूरकर भक्तांनी पालखीला भक्तिपूर्वक निरोप दिला.साईनाथ संस्थानचे अध्यक्ष राजेंद्र गायगोले यांनी सर्व सहभागी भक्तांचे आभार मानले. तसेच, पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्व विश्वस्त मंडळ व सेवाभावी साईभक्त सातत्याने परिश्रम घेत आहेत, असेही ते म्हणाले.पालखी मार्गक्रमण दरम्यान बबनसेठ खंडेलवाल यांनी चहापान चे आयोजन केले होते. याशिवाय सुभाष पानपालिया, संजय पनपालीया, पंकज पारिक, विजय झंवर, अनील पनपालीया, प्रवीण राठी, कार्तिक काळमेघ, सतीश शर्मा, शरद विल्हेकर व गांधीनगर मित्र परिवार यांच्या वतीने चहा, दूध, पाणी बॉटल्स, केळी व बिस्कीट यांचे वाटप करण्यात आले.

ही पालखी १७ दिवसांच्या पवित्र पायदळ यात्रेनंतर शिर्डीतील श्री साईबाबा समाधीस्थळी पोहोचून भक्तांच्या श्रद्धेचा एक अनमोल अध्याय पुन्हा साजरा करणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी या पवित्र यात्रेला भक्तांचे भरभरून सहकार्य आणि प्रेम लाभत आहे.

# मेळघाटातील नागापूर आश्रमशाळेत भिंत कोसळून विद्यार्थिनीचा मृत्यू

## राजकीय वातावरण तापले; माजी आ. राजकुमार पटेल व मुलावर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरातील नागापूर येथील वसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळेत मोठी दुर्घटना घडली आहे. शाळेतील भिंत कोसळून एका १४ वर्षीय विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला असून तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्या आहेत. या घटनेने संपूर्ण मेळघाट हादरला आहे.



दुर्घटना घडल्यानंतर परिसरात संतप्त वातावरण निर्माण झाले. विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी करत शाळा प्रशासन व संस्था चालकांविरोधात आक्रमक भूमिका घेतली. शाळा प्रशासनाकडून तातडीने दोघा कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असले तरी संस्था चालकांवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने रोष वाढला.ही आश्रमशाळा भाजपचे मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांच्या संस्थेच्या अखत्यारीत येते. त्यामुळे या प्रकरणाला राजकीय वळण मिळालं असून विरोधकांनी सरकारवर ताशेरे ओढले आहेत.काल मृत विद्यार्थिनीचा मृतदेह आदिवासी प्रकल्प कार्यालय, धारणी येथे नेण्यात येत असताना माजी आमदार राजकुमार पटेल आणि त्यांचा मुलगा रोहित पटेल यांनी या प्रकरणात सक्रिय सहभाग घेत जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी केली. यावेळी आमदार केवलराम काळे यांच्या कार्यकर्त्यांशी त्यांची वादावादी झाली आणि वातावरण चिघळलं. यानंतर चिखलदरा पोलिसांनी राजकुमार पटेल आणि रोहित पटेल यांना ताब्यात घेतलं.या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.दरम्यान, सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली आहे. समिती लवकरात लवकर आपला अहवाल सादर करणार आहे. तथापि, अद्याप संस्था चालकांविरोधात कोणतीही गुन्हेगारी कारवाई झाली नसल्याने नातेवाईक आणि सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे.

**परिसरात तणावपूर्ण स्थिती**

या घटनेमुळे मेळघाटमधील आश्रमशाळांची सुरक्षा, व्यवस्थापन आणि राजकीय हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. आता या चौकशी अहवालातून कोणती तथ्ये समोर येतात आणि प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सरकारी योजनांपासून पशुपालक वंचित जनजागृतीचा अभाव कारणीभूत

## पशुपालनास कृषीचा दर्जा, केवळ ३४४ जणांचा पुढाकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**



पशुसंवर्धन क्षेत्राला कृषीचा दर्जा देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयानंतर जिल्ह्यातील ३४४ पशुपालक व उत्पादकांनी नोंदणी केली आहे. नोंदणीची मुदत २५ जुलैला संपुष्टात आली असली तरी नोंदणी करता येणार असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे यांनी सांगितले. या योजनेची जनजागृती व्यापक स्तरावर न झाल्याने काही पशुपालक समाविष्ट झाले नसल्याची कबुली त्यांनी दिली.

> योजनेची जनजागृती व्यापक स्तरावर न झाल्याने नोंदणी कमी झाली आहे. अमरावती जिल्ह्यात बऱ्यापैकी नोंदणी झाली असून अजूनही काही पशुपालक, उत्पादक शिल्लक असल्यास त्यांनी नजीकच्या पशुसंवर्धन केंद्रात जाऊन नोंदणी करून घ्यावी.
> **– डॉ. संजय कावरे, उपआयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन.**

नैसर्गिक आपत्तीने पशुपालकांचे नुकसान झाल्यास भरपाई मिळण्यात अडचणी जात होत्या. त्याचबरोबर विद्युत देयकांचा भार वाढल्याने पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या पशुपालनाचा व्यवसाय तोट्याचा होऊ लागला होता. त्यामुळे पशुसंवर्धन क्षेत्राला कृषीचा दर्जा मिळावा, अशी मागणी मातोश्री पोल्ट्रीचे संचालक रवींद्र मेटकर यांच्यासह राज्यभरातील पशुपालकांनी केली होती. पावसाळी अधिवेशनात ही मागणी येऊन मान्य करण्यात पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देण्याची घोषणा करण्यात आली. त्यानंतर राज्यभरातील पशुपालकांच्या नोंदणीची प्रक्रिया पशुसंवर्धन विभागाच्या स्तरावर हाती घेण्यात आली.पशुपालकांनी नोंदणी करण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर फॉर्म व्हायरल करण्यात आला; परंतु असा काही फॉर्म आहे, याची माहितीच नसल्याने अनेक पाशुपालकांनी नोंदणीच केली नाही. गावखेड्यातील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना अशा पशुपालकांचा अर्ज भरून तो अपलोड करण्याचे निर्देश असले तरी त्यांच्याकडूनअपेक्षित सहकार्य मिळालेले नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे आता संबंधित पशुधन अधिकारी अथवा संस्थेंतर्गत कर्मचाऱ्यांनी पशुपालन माहिती नोंदविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, अमरावती जिल्ह्यात मात्र या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. संजय कावरे यांनी सांगितले.

# तब्बल पाच दिवसांनंतर शहरात पावसाचा खंड; उद्यापासून ४ ऑगस्टपर्यंत ऊन, पावसाचा खेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

मागील पाच दिवस आकाश ढगांनी व्यापले होते. त्यामुळे जिल्ह्यात सूर्यदर्शनच झाले नाही. मात्र, बुधवारी ३० जुलै रोजी पाच दिवसांनंतर पावसाने खंड घेतला.

दिवसभर ढगाळ वातावरण असले तरी मध्येच सुयनि दर्शन दिले. त्यामुळे वातावरणात उत्साह वाढला. मात्र, श्रावण महिन्याच्या ख्यातीनुसार गुरुवार ३१ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत शहरासह जिल्ह्यात ऊन पाक्साचा खेळ सुरू राहणार आहे.काहीवेळ काळे मेघ दाटून येतील. पाऊस होईल तर काही वेळ सुर्य आकाशात तळपायला लागल्यानंतर ऊनही येईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र वायव्य मध्यप्रदेशवर सक्रीय आहे. ५६ कि.मी. उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. ते दक्षिण दिशेला झुकले आहेत. त्याचप्रमाणे अरबी समुद्र, गुजरातचा वायव्य भाग आणि मध्यप्रदेश अशी कमी दाबाची द्रोणिय स्थिती आहे.त्यामुळे जिल्ह्यात ३१ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत काही ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात हलक्या पावसाची शक्यता आहे.वातावरण अंशतः ढगाळ राहील. काही प्रमाणात सूर्य प्रकाश राहील. एकूणच काय तर पुढील पाच दिवस आल्हाददायक वातावरण राहण्याची शक्यता श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाचे हवामान तज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांनी वर्तवली आहे.

# माजी आमदार पटेल यांच्या समर्थनार्थ यशोमती ठाकूर यांचा ठिय्या आंदोलन

## पोलिसांवर व भाजप आमदारावर पक्षपाती कारवाईचा आरोप





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१चिखलदरा**

नागापूर येथील आश्रमशाळेत पाण्याची टाकी कोसळून १४ वर्षीय विद्यार्थिनीचा मृत्यू आणि तीन विद्यार्थिनी गंभीर जखमी झाल्याच्या घटनेनंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या दुर्घटनेच्या निषेधार्थ माजी आमदार राजकुमार पटेल व त्यांचे पुत्र रोहित पटेल यांनी शाळा व संस्था प्रशासनाविरोधात आंदोलन केले. या आंदोलनानंतर चिखलदरा पोलिसांनी त्यांना रात्रीपासून ताब्यात घेतले आहे.

पुत्रासह माजी आमदार पटेल यांच्या अटकेच्या निषेधार्थ काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी चिखलदरा पोलीस ठाण्यात दोन तासांपासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.यशोमती ठाकूर यांनी भाजप आमदार केवलराम काळे यांच्या मालकीच्या शाळेत घडलेल्या या गंभीर घटनेनंतरही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप केला आहे.त्याचप्रमाणे, पोलीस प्रशासनावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दबाव असल्यामुळेच भाजपा आमदारावर कारवाई होत नसल्याचा आरोप करत, माजी आमदार पटेल व त्यांच्या पुत्राची तात्काळ सुटका करण्याची मागणी त्यांनी केली आहे.या आंदोलनामुळे परिसरात तणावाचे वातावरण असून राजकीय व सामाजिक स्तरावर या प्रकरणाची तीव्र दखल घेतली जात आहे.

# आधार फेस आयडीद्वारे ज्येष्ठ नागरिकांसाठी हयातीचे प्रमाणपत्र देण्याची सोयीस्कर व सुलभ सेवा उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ सेवानिवृत्ती योजना, विधवा सेवानिवृत्त योजना तसेच दिव्यांग सेवानिवृत्त योजनेतील लाभार्थ्यांना आता घरबसल्या हयातीचे प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. यासाठी 'बेनिफिशरी सत्यापन' ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे.विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हयातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. हयात प्रमाणपत्रासाठी अनेक लाभार्थ्यांना प्रत्यक्ष सरकारी कार्यालये किंवा बँकांमध्ये जावे लागत होते. ज्यामुळे वयोवृद्ध आणि आजारी व्यक्तींना मोठ्या अडचणींना सामोरे



जावे लागत होते. रांगा, लांब अंतराचा प्रवास,आवश्यक कागदपत्रे यांचा त्रास होत होता. काही ठिकाणी तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्रे वेळेत दिली जात नव्हती. मात्र आता सोईचे झाले.या सुविधेमुळे लाभार्थ्यांना आता कार्यालयांमध्ये हेलपाटे मारण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचणार आहे. सरकारच्या 'आपला चेहरा दाखवा, घरबसल्या हयातीचे प्रमाणपत्र मिळवा' या संकल्पनेनुसार हा उपक्रम राबवण्यात येत आहे. तसेच, सत्यापनासाठी ॲपचा वापरही केला जाऊ शकतो.

### लाभार्थ्यांचे हेलपाटे टळणार, सुविधा उपयुक्त ठरणार

लाभार्थ्यांना जीवन प्रमाणपत्रासाठी वारंवार सरकारी कार्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागत होते. आता आधार क्रमांक व फेस ऑथेंटिकेशनच्या मदतीने घरबसल्या ऑनलाइन जीवन प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. यामुळे लाभार्थ्यांचा वेळ, खर्च आणि त्रास वाचणार आहे. ही सुविधा लाभार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### कशी करावी प्रक्रिया ?

आपल्या मोबाइलवर बेनिफिशरी सत्यापन ॲप डाउनलोड करावे. ॲपमध्ये आधार क्रमांक टाकून फेस आयडीद्वारे सत्यापन करावे. सत्यापन पूर्ण झाल्यानंतर हयातीचे प्रमाणपत्र तत्काळ उपलब्ध होईल.

# रक्षाबंधनला लाडकीला ओवाळणी मिळणार!

## २९८४ कोटींचा निधी वर्ग, खात्यात ३००० खटाखट येणार ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु होऊन वर्ष झाले आहे. आता लाडक्या बहिणींना १३वा हप्ता दिला जाणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या जुलैच्या हप्त्याची वाट महिला पाहत आहेत. महिला संपला तरीही अजून याबाबत कोणतीही घोषणा झालेली नाही. आता लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. लाडकी बहीण योजनेच्या जुलैच्या हप्त्यासाठी निधी वर्ग करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास विभागाने लाडकी बहीण योजनेसाठी निधी वर्ग केला आहे. काल ३० जुलै रोजी शासन निर्णय जाहीर केला




आहे. यात जुलैच्या हप्त्यासाठी २९८४ कोटी रुपये वर्ग केले आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी महिलांच्या खात्यात जुलैचे पैसे जमा होऊ शकतात.

जुलैच्या हप्त्यासाठी निधी वर्ग केला असला तरीही आता ऑगस्टच्या हप्त्याचीही चर्चा सुरु झाली आहे. ऑगस्ट महिना सुरु झाला आहे त्यामुळे जुलै अन् ऑगस्टचे पैसे एकत्र येणार का असा प्रश्न विचारला जात आहे. दरम्यान, रक्षाबंधनच्या दिवशी जुलै आणि ऑगस्टचा हप्ता एकत्रितपणे जमा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कदाचित रक्षाबंधनला महिलांच्या खात्यात ३००० रुपये जमा होऊ शकतात.

यंदा रक्षाबंधन ९ ऑगस्ट रोजी आहे. हा सणदेखील बहिणींचा आहे. त्यामुळे या दिवशी सरकार महिलांना खुशखबर देऊ शकते. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै आणि ऑगस्टचा हप्ता रक्षाबंधनला दिला जाऊ शकतो.

लाडकी बहीण योजनेतून तब्बल २६.३४ लाख महिलांना बाद करण्यात आली आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली आहे. या महिला निकषांमध्ये बसत नसल्याने त्यांचे अर्ज बाद केले आहेत. उर्वरित सर्व महिलांच्या खात्यात पैसे जमा केले जातील.

# रेल्वे प्रवाशांना होणार मदत; हेल्पलाइन १३९ चा करा वापर

## भारतीय रेल्वेची जनजागृती मोहीम १ ते १४ ऑगस्टदरम्यान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९बडनेरा**

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी, सेवा सुधारणा आणि तक्रार निवारणाच्या प्रक्रियेला अधिक पारदर्शक व जलद बनवण्यासाठी रेल मदत', हेल्पलाइन क्रमांक १३९ आणि तक्रार निवारण प्रणाली याचा प्रचार करण्यासाठी १ ते १४ ऑगस्ट दरम्यान विशेष जनजागृती मोहीम हाती घेणार आहे.

रेल मदत हे एक केंद्रीकृत डिजिटलप्लॅटफॉर्म असून प्रवासी त्याद्वारे स्वच्छता, खाद्यसेवा, डब्यांची स्थिती तसेच इतर सेवा संबंधित तक्रारी रिअल-टाइममध्ये नोंदवू शकतात आणि त्या सोयीस्करपणे सोडवू




शकतात. तक्रार नोंदवण्यासाठी प्रवाशांना १३९ या राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांकाचा वापर करता येतो, जो फोन कॉल, एसएमएस, ॲप, ई-मेल व सोशल मीडियावर उपलब्ध आहे. या मोहिमेदरम्यान महत्त्वाच्या स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये माहितीपत्रके वाटणे, सार्वजनिक घोषणांद्वारे माहिती देणे तसेच थेट प्रवाशांशी संवाद साधणे असे उपक्रम राबवले जाणार आहेत. रेल मदत आणि हेल्पलाइन १३९ चा अधिकाधिकवापर करावा, आपले अभिप्राय, समस्या आणि सूचना नोंदवून भारतीय रेल्वेला सेवा सुधारण्यात मदत करावी, असे आवाहन रेल्वे प्रशासन च्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रॉपर्टी टॅक्स वसुलीत गती आणा; आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांचे स्पष्ट आदेश

## २ व ३ ऑगस्टला विशेष शिबिरे, १०% सूटही जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आज टॅक्स विभागाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या या बैठकीत प्रॉपर्टी टॅक्स वसुली, थकबाकीदारांची स्थिती, ऑनलाइन टॅक्स भरणा प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी आणि



महसूल वाढीचे उपाय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आयुक्त चांडक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महानगरपालिकेच्या आर्थिक मजबुतीसाठी प्रॉपर्टी टॅक्स वसुली वाढवणे अत्यावश्यक आहे. नागरी सुविधा सुलभ करायच्या असतील तर महसूलवाढ ही काळाची गरज आहे.

विशेष शिबिरे आणि सूटमहानगरपालिका २ आणि ३ ऑगस्ट रोजी शहरातील विविध प्रभागांमध्ये प्रॉपर्टी टॅक्स वसुली शिबिरे घेणार असून, त्यामध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने तात्काळ कर भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये कर भरलेल्या नागरिकांना एकूण रकमेवर १० टक्के सूट देण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. ही सवलत ऑनलाईन भरणाऱ्यांनाही लागू असेल.